# मिरा भाईंदर महानगरपालिका
## स्थायी समिती सभा दि. ०५/०८/२०१०
## (दि. २६/०७/२०१० रोजीची तहकुब सभा)

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा गुरुवार दिनांक ०५/०८/२०१० (दि. २६/०७/२०१० रोजीची तहकुब सभा) रोजी सभा सुचना क्र. ०५ दि. २०/०७/२०१० रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहाद्दुर शास्त्री सभागृहात सकाळी ११.०० वा. सभा आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. दिनेश नलावडे हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**<u>उपस्थित सदस्य</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. दिनेश दगडू नलावडे | -- | सभापती |
| २) | श्रीम. ग्रिटा स्टिफन फॅरो | -- | सदस्या |
| ३) | श्रीम. हेलन जॉर्जी गोविंद | -- | सदस्या |
| ४) | श्री. याकुब ईस्माईल कुरेशी | -- | सदस्य |
| ५) | श्री. अनिल दिवाकर सावंत | -- | सदस्य |
| ६) | श्री. जुबेर इनामदार | -- | सदस्य |
| ७) | श्री. मदन उदितनारायण सिंह | -- | सदस्य |
| ८) | श्री. शरद केशव पाटील | -- | सदस्य |
| ९) | श्री. प्रविण मोरेश्वर पाटील | -- | सदस्य |
| १०) | श्री. चंद्रकांत भिकालाल मोदी | -- | सदस्य |
| ११) | श्री. चंद्रकांत म्हात्रे | -- | सदस्य |
| १२) | सौ. सुधा व्यास | -- | सदस्या |
| १३) | सौ. वर्षा भानुशाली | -- | सदस्या |
| १४) | श्री. बर्नट अल्बर्ट डिमेलो | -- | सदस्य |
| १५) | सौ. निर्मला सावळे | -- | सदस्या |
| १६) | सौ. अनिता पाटील | -- | सदस्या |

**मा. सभापती :-**

सदस्य स्थायी समितीचे सर्व सन्मा., मा. आयुक्त साहेब, उपायुक्त साहेब, सचिव साहेब, सर्व प्रभाग अधिकारी कर्मचारी वर्ग. या सर्वांचे मी आपल्या मिटींगमध्ये स्वागत करतो. आणि सचिवांना विनंती करतो की, सभेच्या कामकाजाला सुरूवात करावी.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ३५, दि. २४/१२/२००९ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**जुबेर इनामदार :-**

दि. २४/१२/२००९ रोजीच्या मा. स्थायी समिती इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**हेलन गोविंद :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजुर.

**प्रकरण क्र. ३५ :-**

दि. २४/१२/२००९ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. ३० :-**

दि. २४/१२/२००९ रोजीच्या मा. स्थायी समिती इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. जुबेर इनामदार          अनुमोदक :- श्रीम. हेलन गोविंद**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ३६, BSUP योजनेच्या निविदेस मंजूरी देणेबाबत.

**निर्मला सावळे :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका मार्फत केंद्र शासनाच्या जवाहरलाल नेहरु शहरी पुनरुत्थान अभियानातर्गत "शहरी गरिबांना मुलभूत सुविधा पुरविणे" या कार्यक्रमातर्गत महानगरपालिका क्षेत्रातील जनता नगर व काशीचर्च या भागातील झोपडपट्टीयांमध्ये मुलभूत सुविधासह निवारा उपलब्ध करुन झोपडपट्टी निवारा योजनेचा प्रस्ताव तयार करुन म्हाडा मार्फत राज्य शासनास सादर करण्यात आला. राज्य शासनाने सदर प्रस्तावास मंजुरी देवून तद्‌नंतर प्रस्ताव मंजूरी साठी केंद्र शासनास सादर करण्यात आला. या प्रकल्पास केंद्र शासनाने दिनांक ११/११/२००९ रोजी मान्यता दिलेली असून प्रकल्पाची किंमत रु. २७९.५५ कोटी एवढी आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मा. महासभा दि. २०/११/२००९ ठराव क्र. ३६ अन्वये प्रकल्पाच्या रुपये ३०० कोटी एवढया खर्चास प्रशासकीय मान्यता दिलेली आहेत.

BSUP योजने अंतर्गत प्राप्त होणाऱ्या निधिचा आकृतीबंध खालीलप्रमाणे आहे.

(रुपये लाखात)

| अ.क्र | तपशिल | केंद्रशासनाचा हिस्सा व निधी | राज्य शासनाचा हिस्सा व निधी | मनपाचा हिस्सा व निधी | झोपडपट्टी धारक हिस्सा |
|---|---|---|---|---|---|
| १ | घराची किंमत | ५० % रु.६५२१.५५/- | ३०% रु.३९१२.९२ | ९ % रु. ११७३.९३ | ११ % रु. १४३४.७५ |
| २ | मुलभूत सुविधा | ५० % रु.४९०२.४० | २५ % रु.३९०८.४० | रु. ६०५९.८४ | |
| | एकूण | रु.११४२९.९९ | रु.७८५६.९१ | रु.७२३३.७७ | रु.१४३४.७९ |

हया प्रकल्पात आस्तित्वात असलेल्या शासकीय जमिनीवर वसलेल्या झोपड्डपट्टीचे पूर्नवसन करणे अंर्तभूत आहे. सदर शासकीय जमिनीचे सर्व्हे नं मौजे काशिगाव ९०,९४,१०७/१/अ,१०८/१ व मौजे मिरेगाव सर्व्हे नं ७७, ७८ या जमिनीवर अस्तित्वात आहेत. सदर जमिन BSUP प्रकल्पासाठी मनपास हस्तातंर करण्यासाठी प्रस्ताव मा. विभागीय आयुक्त कोकण विभाग, नवी मुंबई, यांच्या मार्फत महसुल मा.अप्पर सचिव, व वने विभाग मंत्रालय, मुंबई यांचेकडे दि. ०८/०३/२०१० रोजी सादर केलेला आहे. हस्तांतराची अंतिम कार्यवाही अद्याप प्रलंबित आहे.

निविदा प्रक्रियेसाठी महापालिकेमार्फत तांत्रिक समितीची नेमणूक करण्यात आली असून सदर तांत्रिक समितीमध्ये खालील सदस्य नेमण्यात आले आहेत.

१) प्रो.डॉ. व्ही. ज्योती प्रकाश. (IIT मुंबई)
२) प्रो.डॉ. आर. एस. जांगीड. (IIT मुंबई)

BSUP प्रकल्पासाठी प्रकल्याचा निविदा e-tendering माध्यातून दिनांक २८/२/२०१० रोजी दैनिक DNA व दैनिक लोकसत्ता या वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात आला. तसेच कामाच्या निविदा पूर्व बैठक दिनांक १७/०३/२०१० रोजी घेण्यात आली. कामाची सविस्तर माहितीचे Presentation देण्यात आले. Pre-bid बैठकीमध्ये निविदाकारनी उपस्थित केलेल्या मुद्दांचे स्पष्टीकरण निविदा पूर्व बैठकीचा इतीवृत्तांत करण्यात आले. तसेच निविदेतील अर्टीशतीमध्ये शिथीलता करण्यात आल्या व त्याची सुचनासाठी Corrigendum काढून दिनांक २१/०३/२०१० रोजी दैनिक DNA व दैनिक लोकसत्ता या वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यांत आल्या. निविदा फॉर्म फी स्विकृतीची तारीख ३१/०३/२०१० रोजी होती. निविदा फॉर्म व इसारा रक्कम स्विकृती डी.डी. स्वरुपात दि.०६/०४/२०१० रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत होती. निविदाकारांचा फॉर्म फी व एकूण इसारा रक्कम भरल्याचे विवरण तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | वर्णन | पॅकेज J१ | पॅकेज J२ | पॅकेज J३ | काशी चर्च |
|---|---|---|---|---|---|
| १ | निविदा फॉर्म | रु. ५०,०००/- | रु. ५०,०००/- | रु. ५०,०००/- | रु. २५,०००/- |
| २ | इसारा रक्कम | रु. ४१.७९ लक्ष | रु. ३५.५७ लक्ष | रु. ३७.७८ लक्ष | रु. १४.०५ लक्ष |
| ३ | फॉर्म फी भरणारे एकूण निविदाकार | १२ | १२ | १० | ११ |
| ४ | इसारा रक्कम भरणारे निविदाकार | ०३ | ०४ | ०३ | ०५ |

निविदा e-tendering द्वारे भरण्याची तारीख ७/४/२०१० रोजी ३.०० वाजेपर्यंत होती. Technical Bid उघडण्याची तारीख ७/४/२०१० ठिक ४.०० वाजता होती. सदर दिवशी Technical Bid उघडण्यात आली. खालील प्रमाणे निविदाकारांनी निविदा e-tendering द्वारे भरलेल्या आहेत.

| | निविदा प्राप्त | निविदाकाराचे नांव |
|---|---|---|
| पॅकेज J१ | ०३ | 1) Bitcon India infrastructure Developers (P) Ltd. & Shreeji Construction<br>2) Sumer Corporation , S.V.Jiwani & Stresscreete India Ltd,<br>3) Shayona Corporation & Toscano Infrastructure Pvt Ltd. |
| पॅकेज J२ | ०३ | 1) Bitcon India infrastructure Developers (P) Ltd. & Shreeji |

| | | |
|---|---|---|
| | | Construction<br>2) Jekin Enterprises & Kavya Buildcon Pvt Ltd.<br>3) Sumer Corporation , S.V.Jiwani & Stresscreete India Ltd, |
| पॅकेज J३ | ०३ | 1) Bitcon India infrastructure Developers (P) Ltd. & Shreeji Construction<br>2) Sumer Corporation & S.V.Jiwani<br>3) Stresscreete India Ltd, |
| काशीचर्च | ०२ | 1) Bitcon India infrastructure Developers (P) Ltd. & Shreeji Construction<br>2) D.K Infrastructures Pvt. Ltd., Sumer Corporation , S.V.Jiwani & Stresscreete India Ltd, |

निविदेतील Technical Bid SÉä evaluation करण्यात आली असून वरील सर्व निविदा धारक Pre-qualify होत आहेत. निविदेतील अटीशर्ती नुसार प्रत्येक पॅकेजसाठी आवश्यक असलेल्या Pre-qualification बाबतचे निविदाकारांचे विवरणपत्रे सोबत जोडली आहेत. वरील सर्व निविदाधारक Pre-qualify होत आहेत. त्यांचे दिनांक २०/४/२०१० रोजी Financial Bid उघडण्यात आले. त्यातील निविदाकारांचे दर खालीलप्रमाणे आहेत.

| | निविदाकाराचे नांव | निविदेतील दर | शेरा |
|---|---|---|---|
| पॅकेज J१ | 1) Bitcon India infrastructure Developers (P) Ltd. & Shreeji Construction | १३१७३६०१९८.०० | L३ |
| | 2) Sumer Corporation , S.V.Jiwani & Stresscreete India Ltd, | १३०४९९३१४३.०८ | L२ |
| | 3) Shayona Corporation & Toscano Infrastructure Pvt Ltd. | १२७२७८५८९६.०० | L१ |
| पॅकेज J२ | 1) Bitcon India infrastructure Developers (P) Ltd. & Shreeji Construction | १०७४६८६०६७.०० | L२ |
| | 2) Jekin Enterprises & Kavya Buildcon Pvt Ltd. | १०८१५४५७६५.३० | L३ |
| | Sumer Corporation , S.V.Jiwani & Stresscreete India Ltd, | १०५७३५३८९५.९६ | L१ |
| पॅकेज J३ | 1) Bitcon India infrastructure Developers (P) Ltd. & Shreeji Construction | १०८४१५९३३१.०० | L१ |
| | 2) Sumer Corporation & S.V.Jiwani | १०९१२५५४७६.०० | L२ |
| | 3) Stresscreete India Ltd, | ११७४८५८४००.०० | L३ |
| काशीचर्च | 1) Bitcon India infrastructure Developers (P) Ltd. & Shreeji Construction | ४९६४६९५९८.७० | L२ |
| | 2) D.K Infrastructures Pvt. Ltd., Sumer Corporation , S.V.Jiwani & Stresscreete India Ltd, | ४७५४६७५८१.१० | L१ |

सर्वात कमी दर असलेल्या निविदाकारास दर कमी करणेबाबत पत्राद्ववारे कळविण्यांत आलेले होते. मा. आयुक्त यांच्या दालनात दि. २६/०५/२०१० रोजी दर कमी करण्यासाठी बैठक झाली. ठेकेदाराना दर कमी करण्याच्या सुचना देण्यात आल्या होत्या. तद्नंतर लघुत्तम निविदाकारास वाटाघाटीने दर कमी करण्यासाठी मा.आयुक्त सो. यांच्याकडे दि. ०७/०७/२०१० रोजी परत बोलाविण्यात आलेले होते. दर कमी करुन दराची दरपृथःकरण सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते त्यानुसार ठेकेदारांनी दर कमी करण्याचे पत्र दिले आहे. सविस्तर प्रकल्प अहवाल रु. २७९.५५ कोटी असून हा सन २००८-०९ च्या दरसुचीवर आधारीत होता. सन २००९-१० ची नवीन दरसुची माहे नोव्हेबर २००९ पासून अंमलात आली. सविस्तर प्रकल्प अहवालाची तुलना सन २००९-१० च्या दरसुचीनुसार केली असता किंमत रु. ३३०.३३ कोटी एवढी येत आहे.

सल्लागारामार्फत प्राप्त लघुत्तम निविदांचे दर सन २००९-१० चे दरसुचीनुसार तपासले असता लघुत्तम दर हे सरासरी १०% जास्त आहेत. व मंजुर प्रकल्पाच्या किमंतीच्या सरासरी ३०.१६% जास्त आहेत (दरसुची २००८-०९ नुसार) वित्तीय आकृतीबंधानुसार केंद्र व राज्यशासनाचे प्रकल्पाकरिता अर्थसहयाची रक्कम मंजुरीप्रमाणे प्राप्त होणार आहे. परिणामी जास्त दरांच्या निविदेचा वाढीव आर्थिक बोजा महानगरपालिकेस सोसावा लागणार आहे.

| | लघुत्तम निविदाकाराचे नांव | निविदेतील दर | | वाटाघाटीनंतर कमी केलेले दर | |
|---|---|---|---|---|---|
| | | निविदेची किंमत | Per Sq. mtr | निविदेची किंमत | Per Sq. mtr |
| पॅकेज J१ | Shayona Corporation & Toscano Infrastructure Pvt Ltd. | १२७२७८५८९६.०० | २३६७१.०२ | **१०६७३३०५३०.००** | **१९८५०.००** |
| पॅकेज J२ | Sumer Corporation , S.V.Jiwani & Stresscreete India Ltd, | १०५७३५३८९५.९६ | २३१२१.०० | **९३३०५६१६२.७७** | **२०४०३.००** |
| पॅकेज J३ | Bitcon India infrastructure Developers (P) Ltd. & Shreeji Construction | १०८४१५९३३१.०० | २३०७०.०० | **९३२८३७५६९.६०** | **१९८५०.००** |
| काशी चर्च | D.K Infrastructures Pvt. Ltd., Sumer Corporation , S.V.Jiwani & Stresscreete India Ltd, | ४७५४६७५८१.१० | २२९८०.५४ | **३७२४२००९०.००** | **१८०००.००** |

ठेकेदाराने व सल्लागाराने जास्त निविदेचे दर असण्याची कारणे मुख्यतव्ये खालीलप्रमाणे नमुद केलेली आहेत.

१) सिमेंट, स्टील, पेट्रोल, डिझेल यांची झालेली दरवाढ.
२) निविदेअंतर्गत Transit Camp बांधावा लागणार आहे. त्याची किंमत सुमारे रु. १,५०,०००/- लक्ष प्रती घर एवढी आहे. तथापी प्रकल्पामध्ये Transit Rent रु. ७२,०००/- प्रति घर आहे.
३) निविदेमध्ये Land Development अंतर्गत Hill Cutting फार मोठयाप्रमाणात आहे. प्रकल्प अहवालातील तरतुदीपेक्षा सदर प्रमाण दुप्पटीपेक्षा जास्त आहे.
४) निविदेअंतर्गत सुरक्षा अनामत रक्कम महानगरपालिकेकडे तीन वर्षाकरिता र्निव्याज राहणार आहे. तसेच ही रक्कम काम पूर्ण झाल्यानंतर तीन वर्षाने परत करणार आहे.
५) निविदेअंतर्गत Architecture fee, Permission इ. खर्चाचा समावेश नाही. तसेच मिरा भाईंदर क्षेत्रात पाण्याचे दुर्भिक्ष आहे. परिणामी बांधकामाकरिता लागणारे पाणी दुरुन टॅकरद्वारे आणावे लागणार असल्याने खर्चात वाढ होते.
६) निविदेअंतर्गत Soil Testing, Soil Investigation, Survey, Shifting of Tenement, Quality Control Lab Maintain इ. हया सर्व कामांचा प्रकल्प अहवालात समावेश होत नाही.

नविन दरसुचीनुसार निविदेची Evaluation सल्लागार (PMC) मे. टेक्नो कंन्सल्टंट यांनी करुन सविस्तर दरपृथःकरण मनपास दि.२०/७/२०१० रोजी सादर केले आहे.

| BSUP PROJECT UNDER JNNURM AT JANATANAGAR AND KASHI CHURCH IN MIRA BHAYANDAR MUNICIPAL CORPORATION | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | TENDER EVALUATION STATEMENT | | | | | | |
| 1 | PROJECT AREA | COMPONENT | KASHI CHURCH. | JANATANAGAR-J1 | JANATANAGAR -J2 | JANATANAGA R-J3 | TOTAL |
| 2 | PROJECT COST AS PER DSR 2008-09 | BUILDING | 261087990.25 | 593357764.59 | 510754717.70 | 519488409.89 | 1884688882.43 |
| | | INFRA | 19950427.75 | 242395384.10 | 200641524.19 | 236113576.78 | 699100912.82 |
| | | TOTAL | 281038418.00 | 835753148.69 | 711396241.89 | 755601986.67 | 2583789795.26 |
| 3 | PROPOSED TENAMENTS. | NOS | 471 | 1336 | 1156 | 1173 | 4136.00 |
| 4 | BUILT UP AREA OF PROJECT IN SQM | SQ MTRS | 20690.005 | 53769.804 | 45731.322 | 46994.336 | 167185.47 |
| 5 | FINAL LOWEST BIDDING COST Rs. | Rs | 372420090.00 | 1067330530.00 | 933056162.77 | 932837569.60 | 3305644352.37 |
| 6 | LOWEST BIDDING COST PER SQ MTRS | Rs | 18000.00 | 19850.00 | 20403.00 | 19850.00 | 19772.32 |
| 7 | LOWEST BIDDING COST PER SQ FEET | Rs | 1672.86 | 1844.80 | 1896.19 | 1844.80 | 1814.66 |
| 8 | ESTIMATED COST PER SQ MTRS(2008-09) | BUILDING | 12619.04 | 11035.15 | 11168.60 | 11054.28 | 11273.04 |
| | | INFRA | 964.25 | 4508.02 | 4387.40 | 5024.30 | 4181.59 |
| | | TOTAL | 13583.29 | 15543.17 | 15556.00 | 16078.58 | 15190.26 |
| 10 | ESTIMATED COST (2009-10) | BUILDING | 245768927.66 | 638192287.21 | 548641202.09 | 558612096.22 | 1991214513.18 |
| | | INFRA | 21264192.40 | 53191627.07 | 62693313.47 | 50357741.11 | 187506874.05 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | SPECIAL INFRA | 71528807.95 | 278922030.63 | 236877742.39 | 239428371.36 | 826756952.33 |
| | | TOTAL | 338561928.02 | 970305944.91 | 848212257.95 | 848398208.68 | 3005478339.56 |
| 11 | ESTIMATED COST PER SQ METER(2009-10) | BUILDING | 11878.63 | 11868.97 | 11997.06 | 11886.80 | 11910.21 |
| | | INFRA | 1027.75 | 989.25 | 1370.91 | 1071.57 | 1121.55 |
| | | SPECIAL INFRA | 3457.17 | 5187.34 | 5179.77 | 5094.83 | 4945.15 |
| | | TOTAL | 16363.55 | 18045.55 | 18547.73 | 18053.20 | 17976.91 |
| 12 | ESTIMATED COST PER SQ FEET(2009-10) | BUILDING | 1103.96 | 1103.06 | 1114.97 | 1104.72 | 1106.90 |
| | | INFRA | 95.52 | 91.94 | 127.41 | 99.59 | 104.23 |
| | | SPECIAL INFRA | 321.30 | 482.09 | 481.39 | 473.50 | 459.59 |
| | | TOTAL | 1520.78 | 1677.10 | 1723.77 | 1677.81 | 1670.72 |
| 13 | % ABOVE OVER TENDER | | 32.52 | 30.10 | 33.62 | 25.77 | 30.16 |
| 14 | % ABOVE OVER DSR 2009-10 | | 10.00 | 10.00 | 10.00 | 9.95 | 9.99 |

योजनेचा प्रकल्प अहवाल मे. पुनीत आर्किटेक यांनी तयार केला होता. प्रकल्प अहवाल मध्ये सन २००८-०९ च्या दरानुसार होता. सन २००९-१० च्या दरामध्ये झालेली वाढ, झोपडपट्टी धारकांना तात्पुत्या निवारासाठी Transit Camp बांधावा लागणार आहे. प्रकल्प अहवालामध्ये Transit Rent घेतलेला आहे. Transit Camp मुळे योजनेच्या किंमतीमध्ये वाढ होत आहे. प्रकल्पामध्ये Land Development (Hill Cutting) एकूण काँटीटीच्या ५० टक्केचा समावेश घराची किंमत कमी येण्यासाठी केलेला होता असे मे. पुनीत आर्किटेक यांनी कळविलेले आहे.

वरील सर्व निविदासाठी BSUP प्रकल्पासाठी लागणारा खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | Total cost of Sanction Project ( as per sanction ) DSR 08-09 | २७९.५५ Cr |
| २ | Gross Cost DPR ( As per DSR 09-10 ) | ३३०.३३ Cr |
| ३ | Tender invited for project cost | २५८.३७ Cr |
| ४ | i) Cost of DPR Component ( As per DSR 09-10) | २७१.९९ Cr |
| | ii) Different of cost Transit Rent and Transit Camp for ( 50% basis) | १४.११ Cr |
| | iii) Excess and development cost Hill casting not consider in DPR | १४.४४ Cr |
| | **Total Net Cost** | **३००.५४ Cr** |
| ५ | Tender price offer received cost Rs | ३३०.५६ Cr |
| ६ | Center Govt, State Govt & Ben fishery Share | २०७.२० Cr |
| ७ | Municipal Corporation Share | १२३.३६ Cr |

BSUP प्रकल्पाच्या एकूण जागेच्या २५ % जागा व्यापारी प्रयोजनासाठी वापर करुन मनपा हिस्स्यातील काही खर्च भागविण्यासाठी म्हाडाकडे मनपामार्फत प्रस्ताव सादर केलेला आहे. वरील तुलनात्मक तक्त्यामधील ठेकेदारानी दिलेले Revised price offer (तुलनात्मक तक्ता अ.क्र ६) सन २००९-१० च्या दरापैक्षा १० ऽ जास्त असले तरी दर स्पर्धात्मक असून दर मंजुरीची शिफारस सल्लागार मे. टेक्नो कंन्सल्टंट केली आहे. तरी सदर निविदेस (J1, J2, J3 व काशी ) निविदेस हि सभा मंजूरी देत आहे. तसेच निविदेअंतर्गत Mobilization Advance १० % देण्यास हि सभा मंजूरी देत आहे.

सदर काम BSUP अंतर्गत प्रस्तावीत असल्याने निविदा मंजुरीनुसार प्रत्यक्षात होणाऱ्या खर्चाकरिता सन २०११-२०१२ या वर्षाच्या अर्थसंकल्पात तरतुद करण्यास व रु. ३३०.५६ कोटीच्या सुधारित खर्चास देखील हि सभा मंजुरी देत आहे.

सदर निविदा बाबत त्वरीत योग्य अटीशर्तीचा करारनामा करण्यास व ठेकेदारास कार्यादेश देण्यास BSUP मधील लाभार्थ्यांची यादी निश्चित करणे, लाभार्थ्यांना तात्पुरीते राहण्यासाठी Transit Camp किंवा Transit Rent देणे तसेच BSUP प्रकल्पाचा २५ % जागा व्यापारी प्रयोजनासाठी वापर करुन मनपा हिस्सातील काही खर्च भागविण्यासाठी मा. आयुक्त यांना प्राधिकृत करुन मान्यता देण्यात येत आहे. तसेच निविदा मधील अटीशर्ती व करारनाम्यातील अटीशर्तीनुसार ठेकेदारास वेळोवेळी देयके प्रदान करण्यास ही सभा मंजुरी देत आहे.

**ग्रिटा फॅरो :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

सदर ठराव सर्वानुमते मंजूर कर्ण्यात येत आहे. पूढील विषय घेण्यात यावा.

**प्रकरण क्र.:- ३६**

BSUP योजनेच्या निविदेस मंजूरी देणेबाबत.

**ठराव क्र. ३१ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका मार्फत केंद्र शासनाच्या जवाहरलाल नेहरु शहरी पुनरुत्थान अभियानातर्गत "शहरी गरिबांना मुलभूत सुविधा पुरविणे" या कार्यक्रमातर्गत महानगरपालिका क्षेत्रातील जनता नगर व काशीचर्च या भागातील झोपडपट्टीयांमध्ये मुलभूत सुविधासह निवारा उपलब्ध करुन झोपडपट्टी निवारा योजनेचा प्रस्ताव तयार करुन म्हाडा मार्फत राज्य शासनास सादर करण्यात आला. राज्य शासनाने सदर प्रस्तावास मंजुरी देवून तद्नंतर प्रस्ताव मंजूरी साठी केंद्र शासनास सादर करण्यात आला. या प्रकल्पास केंद्र शासनाने दिनांक ११/११/२००९ रोजी मान्यता दिलेली असून प्रकल्पाची किंमत रु. २७९.५५ कोटी एवढी आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मा. महासभा दि. २०/११/२००९ ठराव क्र. ३६ अन्वये प्रकल्पाच्या रुपये ३०० कोटी एवढया खर्चास प्रशासकीय मान्यता दिलेली आहेत.

BSUP योजने अंतर्गत प्राप्त होणाऱ्या निधिचा आकृतीबंध खालीलप्रमाणे आहे.

(रुपये लाखात)

| अ.क्र | तपशिल | केंद्रशासनाचा हिस्सा व निधी | राज्य शासनाचा हिस्सा व निधी | मनपाचा हिस्सा व निधी | झोपडपट्टी धारक हिस्सा |
|---|---|---|---|---|---|
| १ | घराची किंमत | ५० % रु.६५२१.५५/- | ३०% रु.३९१२.९२ | ९ % रु. ११७३.९३ | ११ % रु. १४३४.७५ |
| २ | मुलभूत सुविधा | ५० % रु.४९०२.४० | २५ % रु.३९०८.४० | रु. ६०५९.८४ | |
| | एकूण | रु.११४२९.९९ | रु.७८५६.९१ | रु.७२३३.७७ | रु.१४३४.७९ |

हया प्रकल्पात आस्तित्वात असलेल्या शासकीय जमिनीवर वसलेल्या झोपड्डपट्टीचे पूर्नवसन करणे अंर्तभूत आहे. सदर शासकीय जमिनीचे सर्व्हे नं मौजे काशिगाव ९०,९४,१०७/१/अ,१०८/१ व मौजे मिरेगाव सर्व्हे नं ७७, ७८ या जमिनीवर अस्तित्वात आहेत. सदर जमिन BSUP प्रकल्पासाठी मनपास हस्तातंर करण्यासाठी प्रस्ताव मा. विभागीय आयुक्त कोकण विभाग, नवी मुंबई, यांच्या मार्फत महसुल मा.अप्पर सचिव, व वने विभाग मंत्रालय, मुंबई यांचेकडे दि. ०८/०३/२०१० रोजी सादर केलेला आहे. हस्तांतराची अंतिम कार्यवाही अद्याप प्रलंबित आहे.

निविदा प्रक्रियेसाठी महापालिकेमार्फत तांत्रिक समितीची नेमणूक करण्यात आली असून सदर तांत्रिक समितीमध्ये खालील सदस्य नेमण्यात आले आहेत.

१) प्रो.डॉ. व्ही. ज्योती प्रकाश. (IIT मुंबई)

२) प्रो.डॉ. आर. एस. जांगीड. (IIT मुंबई)

BSUP प्रकल्पासाठी प्रकल्याचा निविदा e-tendering माध्यातून दिनांक २८/२/२०१० रोजी दैनिक DNA व दैनिक लोकसत्ता या वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात आला. तसेच कामाच्या निविदा पूर्व बैठक दिनांक १७/०३/२०१० रोजी घेण्यात आली. कामाची सविस्तर माहितीचे Presentation देण्यात आले. Pre-bid बैठकीमध्ये निविदाकारनी उपस्थित केलेल्या मुद्दांचे स्पष्टीकरण निविदा पूर्व बैठकीचा इतीवृत्तांत करण्यात आले. तसेच निविदेतील अर्टीशतीमध्ये शिथीलता करण्यात आल्या व त्याची सुचनासाठी Corrigendum काढून दिनांक २१/०३/२०१० रोजी दैनिक DNA व दैनिक लोकसत्ता या वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यांत आल्या. निविदा फॉर्म फी स्विकृतीची तारीख ३१/०३/२०१० रोजी होती. निविदा फॉर्म व इसारा रक्कम स्विकृती डी.डी. स्वरुपात दि.०६/०४/२०१० रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत होती. निविदाकारांचा फॉर्म फी व एकूण इसारा रक्कम भरल्याचे विवरण तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | वर्णन | पॅकेज J१ | पॅकेज J२ | पॅकेज J३ | काशी चर्च |
|---|---|---|---|---|---|
| १ | निविदा फॉर्म | रु. ५०,०००/- | रु. ५०,०००/- | रु. ५०,०००/- | रु. २५,०००/- |
| २ | इसारा रक्कम | रु. ४१.७९ लक्ष | रु. ३५.५७ लक्ष | रु. ३७.७८ लक्ष | रु. १४.०५ लक्ष |
| ३ | फॉर्म फी भरणारे एकूण निविदाकार | १२ | १२ | १० | ११ |
| ४ | इसारा रक्कम भरणारे निविदाकार | ०३ | ०४ | ०३ | ०५ |

निविदा e-tendering द्वारे भरण्याची तारीख ७/४/२०१० रोजी ३.०० वाजेपर्यंत होती. Technical Bid उघडण्याची तारीख ७/४/२०१० ठिक ४.०० वाजता होती. सदर दिवशी Technical Bid उघडण्यात आली. खालील प्रमाणे निविदाकारांनी निविदा e-tendering द्वारे भरलेल्या आहेत.

| | निविदा प्राप्त | निविदाकाराचे नांव |
|---|---|---|
| पॅकेज J१ | ०३ | 4) Bitcon India infrastructure Developers (P) Ltd. & Shreeji Construction<br>5) Sumer Corporation , S.V.Jiwani & Stresscreete India Ltd,<br>6) Shayona Corporation & Toscano Infrastructure Pvt Ltd. |
| पॅकेज J२ | ०३ | 4) Bitcon India infrastructure Developers (P) Ltd. & Shreeji Construction |

| | | |
|---|---|---|
| | | 5) Jekin Enterprises & Kavya Buildcon Pvt Ltd.<br>6) Sumer Corporation , S.V.Jiwani & Stresscreete India Ltd, |
| पॅकेज J३ | ०३ | 4) Bitcon India infrastructure Developers (P) Ltd. & Shreeji Construction<br>5) Sumer Corporation & S.V.Jiwani<br>6) Stresscreete India Ltd, |
| काशीचर्च | ०२ | 3) Bitcon India infrastructure Developers (P) Ltd. & Shreeji Construction<br>4) D.K Infrastructures Pvt. Ltd., Sumer Corporation , S.V.Jiwani & Stresscreete India Ltd, |

निविदेतील Technical Bid SÉä evaluation करण्यात आली असून वरील सर्व निविदा धारक Pre-qualify होत आहेत. निविदेतील अटीशर्ती नुसार प्रत्येक पॅकेजसाठी आवश्यक असलेल्या Pre-qualification बाबतचे निविदाकारांचे विवरणपत्रे सोबत जोडली आहेत. वरील सर्व निविदाधारक Pre-qualify होत आहेत. त्यांचे दिनांक २०/४/२०१० रोजी Financial Bid उघडण्यात आले. त्यातील निविदाकारांचे दर खालीलप्रमाणे आहेत.

| | निविदाकाराचे नांव | निविदेतील दर | शेरा |
|---|---|---|---|
| पॅकेज J१ | 4) Bitcon India infrastructure Developers (P) Ltd. & Shreeji Construction | १३१७३६०१९८.०० | L३ |
| | 5) Sumer Corporation , S.V.Jiwani & Stresscreete India Ltd, | १३०४९९३१४३.०८ | L२ |
| | 6) Shayona Corporation & Toscano Infrastructure Pvt Ltd. | १२७२७८५८९६.०० | L१ |
| पॅकेज J२ | 3) Bitcon India infrastructure Developers (P) Ltd. & Shreeji Construction | १०७४६८६०६७.०० | L२ |
| | 4) Jekin Enterprises & Kavya Buildcon Pvt Ltd. | १०८१५४५७६५.३० | L३ |
| | Sumer Corporation , S.V.Jiwani & Stresscreete India Ltd, | १०५७३५३८९५.९६ | L१ |
| पॅकेज J३ | 4) Bitcon India infrastructure Developers (P) Ltd. & Shreeji Construction | १०८४१५९३३१.०० | L१ |
| | 5) Sumer Corporation & S.V.Jiwani | १०९१२५५४७६.०० | L२ |
| | 6) Stresscreete India Ltd, | ११७४८५८४००.०० | L३ |
| काशीचर्च | 3) Bitcon India infrastructure Developers (P) Ltd. & Shreeji Construction | ४९६४६९५९८.७० | L२ |
| | 4) D.K Infrastructures Pvt. Ltd., Sumer Corporation , S.V.Jiwani & Stresscreete India Ltd, | ४७५४६७५८१.१० | L१ |

सर्वात कमी दर असलेल्या निविदाकारास दर कमी करणेबाबत पत्राद्ववारे कळविण्यांत आलेले होते. मा. आयुक्त यांच्या दालनात दि. २६/०५/२०१० रोजी दर कमी करण्यासाठी बैठक झाली. ठेकेदाराना दर कमी करण्याच्या सुचना देण्यात आल्या होत्या. तद्‌नंतर लघुत्तम निविदाकारास वाटाघाटीने दर कमी करण्यासाठी मा.आयुक्त सो. यांच्याकडे दि. ०७/०७/२०१० रोजी परत बोलाविण्यात आलेले होते. दर कमी करुन दराची दरपृथःकरण सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते त्यानुसार ठेकेदारांनी दर कमी करण्याचे पत्र दिले आहे. सविस्तर प्रकल्प अहवाल रु. २७९.५५ कोटी असून हा सन २००८-०९ च्या दरसुचीवर आधारीत होता. सन २००९-१० ची नवीन दरसुची माहे नोव्हेबर २००९ पासून अंमलात आली. सविस्तर प्रकल्प अहवालाची तुलना सन २००९-१० च्या दरसुचीनुसार केली असता किंमत रु. ३३०.३३ कोटी एवढी येत आहे.

सल्लागारामार्फत प्राप्त लघुत्तम निविदांचे दर सन २००९-१० चे दरसुचीनुसार तपासले असता लघुत्तम दर हे सरासरी १०% जास्त आहेत. व मंजुर प्रकल्पाच्या किमंतीच्या सरासरी ३०.१६% जास्त आहेत (दरसुची २००८-०९ नुसार) वित्तीय आकृतीबंधानुसार केंद्र व राज्यशासनाचे प्रकल्पाकरिता अर्थसहयाची रक्कम मंजुरीप्रमाणे प्राप्त होणार आहे. परिणामी जास्त दरांच्या निविदेचा वाढीव आर्थिक बोजा महानगरपालिकेस सोसावा लागणार आहे.

| | लघुत्तम निविदाकाराचे नांव | निविदेतील दर | वाटाघाटीनंतर कमी केलेले दर |
|---|---|---|---|

| | | निविदेची किंमत | Per Sq. mtr | निविदेची किंमत | Per Sq. mtr |
|---|---|---|---|---|---|
| पॅकेज J१ | Shayona Corporation & Toscano Infrastructure Pvt Ltd. | १२७२७८५८९६.०० | २३६७१.०२ | **१०६७३३०५३०.००** | **१९८५०.००** |
| पॅकेज J२ | Sumer Corporation , S.V.Jiwani & Stresscreete India Ltd, | १०५७३५३८९५.९६ | २३१२१.०० | **९३३०५६१६२.७७** | **२०४०३.००** |
| पॅकेज J३ | Bitcon India infrastructure Developers (P) Ltd. & Shreeji Construction | १०८४१५९३३१.०० | २३०७०.०० | **९३२८३७५६९.६०** | **१९८५०.००** |
| काशी चर्च | D.K Infrastructures Pvt. Ltd., Sumer Corporation , S.V.Jiwani & Stresscreete India Ltd, | ४७५४६७५८१.१० | २२९८०.५४ | **३७२४२००९०.००** | **१८०००.००** |

ठेकेदाराने व सल्लागाराने जास्त निविदेचे दर असण्याची कारणे मुख्यतव्ये खालीलप्रमाणे नमुद केलेली आहेत.

७) सिमेंट, स्टील, पेट्रोल, डिझेल यांची झालेली दरवाढ.

८) निविदेअंतर्गत Transit Camp बांधावा लागणार आहे. त्याची किंमत सुमारे रु. १,५०,०००/- लक्ष प्रती घर एवढी आहे. तथापी प्रकल्पामध्ये Transit Rent रु. ७२,०००/- प्रति घर आहे.

९) निविदेमध्ये Land Development अंतर्गत Hill Cutting फार मोठयाप्रमाणात आहे. प्रकल्प अहवालातील तरतुदीपेक्षा सदर प्रमाण दुप्पटीपेक्षा जास्त आहे.

१०) निविदेअंतर्गत सुरक्षा अनामत रक्कम महानगरपालिकेकडे तीन वर्षाकरिता र्निव्याज राहणार आहे. तसेच ही रक्कम काम पूर्ण झाल्यानंतर तीन वर्षाने परत करणार आहे.

११) निविदेअंतर्गत Architecture fee, Permission इ. खर्चाचा समावेश नाही. तसेच मिरा भाईंदर क्षेत्रात पाण्याचे दुर्भिक्ष आहे. परिणामी बांधकामाकरिता लागणारे पाणी दुरुन टॅकरद्वारे आणावे लागणार असल्याने खर्चात वाढ होते.

१२) निविदेअंतर्गत Soil Testing, Soil Investigation, Survey, Shifting of Tenement, Quality Control Lab Maintain इ. हया सर्व कामांचा प्रकल्प अहवालात समावेश होत नाही.

नविन दरसुचीनुसार निविदेची Evaluation सल्लागार (PMC) मे. टेक्नो कंन्सल्टंट यांनी करुन सविस्तर दरपृथःकरण मनपास दि.२०/७/२०१० रोजी सादर केले आहे.

**BSUP PROJECT UNDER JNNURM AT JANATANAGAR AND KASHI CHURCH IN MIRA BHAYANDAR MUNICIPAL CORPORATION**

**TENDER EVALUATION STATEMENT**

| 1 | PROJECT AREA | COMPONENT | KASHI CHURCH. | JANATANAGAR-J1 | JANATANAGAR -J2 | JANATANAGA R-J3 | TOTAL |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 2 | PROJECT COST AS PER DSR 2008-09 | BUILDING | 261087990.25 | 593357764.59 | 510754717.70 | 519488409.89 | 1884688882.43 |
| | | INFRA | 19950427.75 | 242395384.10 | 200641524.19 | 236113576.78 | 699100912.82 |
| | | TOTAL | 281038418.00 | 835753148.69 | 711396241.89 | 755601986.67 | 2583789795.26 |
| 3 | PROPOSED TENAMENTS. | NOS | 471 | 1336 | 1156 | 1173 | 4136.00 |
| 4 | BUILT UP AREA OF PROJECT IN SQM | SQ MTRS | 20690.005 | 53769.804 | 45731.322 | 46994.336 | 167185.47 |
| 5 | FINAL LOWEST BIDDING COST Rs. | Rs | 372420090.00 | 1067330530.00 | 933056162.77 | 932837569.60 | 3305644352.37 |
| 6 | LOWEST BIDDING COST PER SQ MTRS | Rs | 18000.00 | 19850.00 | 20403.00 | 19850.00 | 19772.32 |
| 7 | LOWEST BIDDING COST PER SQ FEET | Rs | 1672.86 | 1844.80 | 1896.19 | 1844.80 | 1814.66 |
| 8 | ESTIMATED COST PER SQ MTRS(2008-09) | BUILDING | 12619.04 | 11035.15 | 11168.60 | 11054.28 | 11273.04 |
| | | INFRA | 964.25 | 4508.02 | 4387.40 | 5024.30 | 4181.59 |
| | | TOTAL | 13583.29 | 15543.17 | 15556.00 | 16078.58 | 15190.26 |
| 10 | ESTIMATED COST (2009-10) | BUILDING | 245768927.66 | 638192287.21 | 548641202.09 | 558612096.22 | 1991214513.18 |
| | | INFRA | 21264192.40 | 53191627.07 | 62693313.47 | 50357741.11 | 187506874.05 |
| | | SPECIAL INFRA | 71528807.95 | 278922030.63 | 236877742.39 | 239428371.36 | 826756952.33 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | TOTAL | 338561928.02 | 970305944.91 | 848212257.95 | 848398208.68 | 3005478339.56 |
| 11 | ESTIMATED COST PER SQ METER(2009-10) | BUILDING | 11878.63 | 11868.97 | 11997.06 | 11886.80 | 11910.21 |
| | | INFRA | 1027.75 | 989.25 | 1370.91 | 1071.57 | 1121.55 |
| | | SPECIAL INFRA | 3457.17 | 5187.34 | 5179.77 | 5094.83 | 4945.15 |
| | | TOTAL | 16363.55 | 18045.55 | 18547.73 | 18053.20 | 17976.91 |
| 12 | ESTIMATED COST PER SQ FEET(2009-10) | BUILDING | 1103.96 | 1103.06 | 1114.97 | 1104.72 | 1106.90 |
| | | INFRA | 95.52 | 91.94 | 127.41 | 99.59 | 104.23 |
| | | SPECIAL INFRA | 321.30 | 482.09 | 481.39 | 473.50 | 459.59 |
| | | TOTAL | 1520.78 | 1677.10 | 1723.77 | 1677.81 | 1670.72 |
| 13 | % ABOVE OVER TENDER | | 32.52 | 30.10 | 33.62 | 25.77 | 30.16 |
| 14 | % ABOVE OVER DSR 2009-10 | | 10.00 | 10.00 | 10.00 | 9.95 | 9.99 |

योजनेचा प्रकल्प अहवाल मे. पुनीत आर्किटेक यांनी तयार केला होता. प्रकल्प अहवाल मध्ये सन २००८-०९ च्या दरानुसार होता. सन २००९-१० च्या दरामध्ये झालेली वाढ, झोपडपट्टी धारकांना तात्पुत्या निवारासाठी Transit Camp बांधावा लागणार आहे. प्रकल्प अहवालामध्ये Transit Rent घेतलेला आहे. Transit Camp मुळे योजनेच्या किंमतीमध्ये वाढ होत आहे. प्रकल्पामध्ये Land Development (Hill Cutting) एकूण कॉटीटीच्या ५० टक्केचा समावेश घराची किंमत कमी येण्यासाठी केलेला होता असे मे. पुनीत आर्किटेक यांनी कळविलेले आहे.

वरील सर्व निविदासाठी BSUP प्रकल्पासाठी लागणारा खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | Total cost of Sanction Project ( as per sanction ) DSR 08-09 | २७९.५५ Cr |
| २ | Gross Cost DPR ( As per DSR 09-10 ) | ३३०.३३ Cr |
| ३ | Tender invited for project cost | २५८.३७ Cr |
| ४ | i) Cost of DPR Component ( As per DSR 09-10) | २७१.९९ Cr |
| | ii) Different of cost Transit Rent and Transit Camp for ( 50% basis) | १४.११ Cr |
| | iii) Excess and development cost Hill casting not consider in DPR | १४.४४ Cr |
| | **Total Net Cost** | **३००.५४ Cr** |
| ५ | Tender price offer received cost Rs | ३३०.५६ Cr |
| ६ | Center Govt, State Govt & Ben fishery Share | २०७.२० Cr |
| ७ | Municipal Corporation Share | १२३.३६ Cr |

BSUP प्रकल्पाच्या एकूण जागेच्या २५ % जागा व्यापारी प्रयोजनासाठी वापर करुन मनपा हिस्स्यातील काही खर्च भागविण्यासाठी म्हाडाकडे मनपामार्फत प्रस्ताव सादर केलेला आहे. वरील तुलनात्मक तक्त्यामधील ठेकेदारानी दिलेले Revised price offer (तुलनात्मक तक्ता अ.क्र ६) सन २००९-१० च्या दरापैक्षा १० ऽ जास्त असले तरी दर स्पर्धात्मक असून दर मंजुरीची शिफारस सल्लागार मे. टेक्नो कंन्सल्टंट केली आहे. तरी सदर निविदेस (J1, J2, J3 व काशी ) निविदेस हि सभा मंजूरी देत आहे. तसेच निविदेअंतर्गत Mobilization Advance १० % देण्यास हि सभा मंजूरी देत आहे.

सदर काम BSUP अंतर्गत प्रस्तावीत असल्याने निविदा मंजुरीनुसार प्रत्यक्षात होणाऱ्या खर्चाकरिता सन २०११-२०१२ या वर्षाच्या अर्थसंकल्पात तरतुद करण्यास व रु. ३३०.५६ कोटीच्या सुधारित खर्चास देखील हि सभा मंजुरी देत आहे.

सदर निविदा बाबत त्वरीत योग्य अटीशर्तीचा करारनामा करण्यास व ठेकेदारास कार्यादेश देण्यास BSUP मधील लाभार्थ्यांची यादी निश्चित करणे, लाभार्थ्यांना तात्पुरीते राहण्यासाठी Transit Camp किंवा Transit Rent देणे तसेच BSUP प्रकल्पाचा २५ % जागा व्यापारी प्रयोजनासाठी वापर करुन मनपा हिस्सातील काही खर्च भागविण्यासाठी मा. आयुक्त यांना प्राधिकृत करुन मान्यता देण्यात येत आहे. तसेच निविदा मधील अटीशर्ती व करारनाम्यातील अटीशर्तीनुसार ठेकेदारास वेळोवेळी देयके प्रदान करण्यास ही सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्रीम. निर्मला सावळे** **अनुमोदक :- श्रीम. ग्रिटा फॅरो**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिवः-**

प्रकरण क्र. ३७, मिरा भाईंदर महानगरपालिका अग्निशमन दलाकरिता दोन लहान टाटा ४०७/३१०० चेसिसवर फायर टेंडर बॉडी बांधणेबाबत.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

प्रकरण क्र. ३७ च्या गोषवाऱ्यानुसार मे. हायटेक सर्विसेस ह्यांचे दर सर्वात कमी आहेत. तेव्हा २ नग वॉटर टेंडर रु. ३०,६१,८००/- ह्याप्रमाणे २ नग मिनी वॉटर टेंडर बॉडी बांधणेकामी व त्या वाहनासोबत अतिरिक्त साहित्य पुरवठा करणेकामी रु. २१,१७,०००/- ह्या दराने २ नग वॉटर टेंडर बॉडी बांधून व त्यासोबतच्या अतिरिक्त साहित्यासह ४ महिन्याच्या मुदतीत पुरविणेकामी तसेच सदरचे काम मुदतीत पार न पाडल्यास प्रति दिन रु. ५,०००/- याप्रमाणे विलंब शुल्क आकारण्यात यावे अशा सुचनेसह ही स्थायी समिती सभा कमी दराच्या मे. हायटेक सर्विसेस ह्यांच्या निविदेस मंजूरी देत आहे.

**अनिता पाटील :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**शरद पाटील :-**

मा. सभापती साहेब, ही जी निविदा आता आलेली आहे. या दोनच निविदा आहेत. कमीत कमी ३ निविदा तरी असतात.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

पाच वेळेस निवीदा मागविल्या आहेत.

**शरद पाटील :-**

मग यात तुम्ही तसा उल्लेख का नाही केला?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

लिहिल आहे ना. उल्लेख आहे.

**शरद पाटील :-**

कुठे लिहिल आहे? तुम्ही आता बोलला की उल्लेख आहे. तर कुठे आहे? तुम्ही उल्लेख का करत नाही. मग, आम्हाला कस समजेल. आयुक्त साहेब, अशा जर दोनच निविदा येत असतील. तर साहेब तुम्ही बघा. आम्हाला याच्यावर काही बोलायच नाही. पण, दुसरी काही गोष्टी आहे का? आपण दोन निविदांना करत असु तर ते नियमबाह्य होतील ना.

**मा. आयुक्त :-**

नियम बाह्य होत नाही. आपण ५ वेळा टेंडर काढले. आणि ५ वेळा टेंडर काढून ५ वेळा कोणी टेंडर भरले नाही. आणि ५ वेळा टेंडर काढून १ जरी निविदा आली आणि योग्य असेल तर ते मंजूर करणार.

**शरद पाटील :-**

बरोबर आहे. पण तुम्ही याच्यात नोंद करायला पाहिजे ना. ५ वेळा आपण निविदा मागतो गोषवारामध्ये.

**मा. सभापती :-**

सदर ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे. तसेच पुढील विषय घेण्यात यावा.

**प्रकरण क्र. ३७ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका अग्निशमन दलाकरिता दोन लहान टाटा ४०७/३१०० चेसिसवर फायर टेंडर बॉडी बांधणेबाबत.

**ठराव क्र. ३२ :-**

प्रकरण क्र. ३७ च्या गोषवाऱ्यानुसार मे. हायटेक सर्विसेस ह्यांचे दर सर्वात कमी आहेत. तेव्हा २ नग वॉटर टेंडर रु. ३०,६१,८००/- ह्याप्रमाणे २ नग मिनी वॉटर टेंडर बॉडी बांधणेकामी व त्या वाहनासोबत अतिरिक्त साहित्य पुरवठा करणेकामी रु. २१,१७,०००/- ह्या दराने २ नग वॉटर टेंडर बॉडी बांधून व त्यासोबतच्या अतिरिक्त साहित्यासह ४ महिन्याच्या मुदतीत पुरविणेकामी तसेच सदरचे काम मुदतीत पार न पाडल्यास प्रति दिन रु. ५,०००/- याप्रमाणे विलंब शुल्क आकारण्यात यावे अशा सुचनेसह ही स्थायी समिती सभा कमी दराच्या मे. हायटेक सर्विसेस ह्यांच्या निविदेस मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. चंद्रकांत म्हात्रे** **अनुमोदक :- सौ. अनिता पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**शरद पाटील :-**

मग यात तुम्ही तसा उल्लेख का नाही केला?

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ३८, निविदांना मान्यता देणे बाबत. (सार्व. बांधकाम विभाग)

**जुबेर इनामदार :-**

| अ.क्र. | कामाचे नांव / ठेकेदाराचे नांव | अंदाजित खर्च / ठेकेदाराने सादर केलेले दर |
|---|---|---|
| १ | मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील भाईंदर (पूर्व) खारीगांव शाळेकरीता वाढीव पहिला, दुसरा व तिसरा मजल्याचे उर्वरीत बांधकाम करणे. भाग – २<br><br>१) मे. ललित इंटरप्रायजेस<br><br>दर कमी करून<br>(सन २००९ – १० च्या जिल्हादरसुचीतील दरानुसार) | रु. ४९,९९,८००/-<br><br>७४.०० % जास्त दराने<br><br>७०.०० % जास्त दराने<br>(१६.३९ % जास्त दराने) |

| अ.क्र. | कामाचे नांव / ठेकेदाराचे नांव | अंदाजित खर्च / ठेकेदाराने सादर केलेले दर |
|---|---|---|
| २ | भाईंदर (प) येथील महानगरपालिकेच्या शाळेच्या इमारतीवर शेड बांधणे.<br><br>१) मे. साळवी कंन्स्ट्रक्शन<br>२) मे. कल्पतरू इंटरप्रायजेस | रु. १८,४३,७००/-<br><br>८.०० % कमी दराने<br>०.०१ % कमी दराने |
| ३ | भाईंदर (पूर्व) ओस्वाल ऑर्नेट पासून युनायटेड पॅलेस पर्यत रस्ता तयार करणे.<br>**मे. गांवदेवी मजूर कामगार सहकारी संस्था मर्या.** | रू. १४,३१,३००/-<br><br>**अंदाजपत्रक दराने** |

वरीलपैकी अ.क्र. २ च्या कामी मे. साळवी कंन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकातील दरापेक्षा ८% कमी दराची निविदास मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र. १ च्या कामाचे अंदाजपत्रकातील दर हे सन २००५ – ०६ या वर्षाच्या दरसुचीतील असून त्यानुसार एकूण रू. ४९,९९,७७७/- रकमेचे अंदाजपत्रक होत आहे.

तथापी सद्यस्थितीत सन २००९ – १० या वर्षाचे जिल्हा दरसुचीतील दर उपलब्ध असून त्यानुसार सदर अंदाजपत्रक रू. ७३,०२,५०९/- रकमेचे असल्याबाबत तांत्रिक सल्लागार मे. आर्चिझम यांनी कळविलेले आहे. प्रत्यक्षात ठेकेदाराने सन २००५ – ०६ या वर्षाच्या जिल्हादरसुचीतील दरानुसार दरवाटाघाटीनंतर ७०.००% जास्त दर सादर केले आहेत. सदर दराची तुलना सन २००९ – १० या वर्षाच्या जिल्हा दरसुचीतील दराशी करता ठेकेदारानी भरलेले दर १६.३९ % जास्त दराची आहे. सदर निविदेस मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र. ३ चे काम तातडीचे असल्याने जिल्हा मजूर सोसायटी कडून आलेल्या शिफारसीनुसार मे. गांवदेवी मजूर कामगार सहकारी संस्था मर्या यांना कार्यादेश देऊन सुरू करण्यात आलेले आहे. सदर निविदेस मान्यता देण्यात येत आहे.

वरील कामी ठेकेदारांना वेळोवेळी देयके प्रदान करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

**मदन उदितनारायण सिंह :-**

मा. सभापती साहब, इसमे तो एक काम मे एक ही निविदा है।

**मा. आयुक्त :-**

यामध्ये थोडीशी चर्चा करायची आहे.

**मदन उदितनारायण सिंह :-**

मा. आयुक्त साहब, इसमे एक काम मे एकही निविदा है। दुसरे मे दो है।

**दिपक खांबित :-**

दिली आहे ना. ८ टक्के दिलेल आहे.

**मदन उदितनारायण सिंह :-**

उपरवाले ७० टक्के जास्त है।

**दिपक खांबित :-**

१६ टक्के ही है वह।

**मदन उदितनारायण सिंह :-**

फिर भी १६ टक्के है। एक ही निविदा है तो आपने फिरसे क्यो नही मंगाया।

**दिपक खांबीत :-**

वह सेकंड टाईम है।

**मदन उदितनारायण सिंह :-**

भले सेकंड नही थ्रड हो कितना भी होने दो। साहब लेकिन एक निविदा पर देते है क्या?

**दिपक खांबीत :-**

देते है।

**मदन उदितनारायण सिंह :-**

तो फिर ३-४ निविदा मंगानेकी क्या जरूरत है। हमेशा एक पे ही देते जाओ।

**शरद पाटील :-**

आपल्याला एकच निविदा येत असेल असे वाटल तर आपण नियमानुसार किती वेळा निविदा काढू शकतो.

**दिपक खांबित :-**

पहिल्याच वेळेला तुम्हाला दर जर योग्य वाटत असेल तर तुम्ही एक देवू शकता.

**शरद पाटील :-**

एक निविदा असेल तर देवू शकतो. मग, आता १६ टक्के जास्त दराने असे आपल्याला वाटले तर त्यांना पहिल्याच वेळेला देवून टाकायच वाटले. १६ टक्के जास्त आहे तर तुम्हाला ते बरोबर वाटत.

**दिपक खांबित :-**

बिल्डींगच काम आहे ना. त्याच्यासाठी परवडत नाही.

**मदन उदितनारायण सिंह :-**

तेच तर म्हणायच आहे. बांधकाम मध्येच सगळे निविदा अबॉव का जातात? आपण बाकीच्या पण निविदा काढतो. त्यात सगळ आपण कमी देतो. बांधकाम मध्येच अबॉव का देतो?

**प्रविण पाटील :-**

साहेब, अंदाजपत्रक बनवताना तस बनवल पाहिजे ना. अंदाजपत्रक चुकीच बनवतो मग अस होत.

**दिपक खांबित:-**

आपण यावेळेला मा. महासभेत याची मंजूरी पण घेतली होती.

**प्रविण पाटील :-**

तस नाही. आपण अंदाजपत्रक बनवायला देतो. मग, अंदाजपत्रक चुकीच बनवतो अस होत ना.

**दिपक खांबित :-**

याची पुन्हा मा. महासभेमध्ये मंजूरी घ्यायला लागेल.

**मा. आयुक्त :-**

मा. सभापती साहेब, महापालिका, मा. महासभेमध्ये वेळोवेळी या विषयी चर्चा झालेली आहे. की, खाजगी ले आऊट मधले जे आर.जी. असतात त्या आर.जी. डेव्हलोपमेंट महापालिकेमार्फत करावी अशी मागणी सर्व सभासदांकडुन होत होती. तर, त्यामध्ये आपण म्हंटल होत की, त्या सोसायटीच्या मालकीच राहिल आणि त्या बिल्डरच्या मालकीच राहिल. आणि त्यांनी जर, डेव्हलपमेन्ट केल नाही तर महापालिकेने ताब्यात घ्यायच. असा एक चार दिवसापूर्वी निर्णय झालेला आहे. आता आपण नगरसेवक निधी आणि प्रभाग निधी हे चार-चार सभासदांनी एकत्रीकरण केल. तर, एखादी बालवाडी, आधार केंद्र किंवा कम्युनिटी सेंटर किंवा आर.सी.एच दवाखान्याचे अशा वेगवेगळ्या योजना घेता येतील. तर प्रत्येक वेळेला काही वॉर्डात काम सुध्दा राहिलेले नाही.

**मदन उदितनारायण सिंह :-**

है ना।

**मा. आयुक्त :-**

काही वॉर्डामध्ये.

**शरद पाटील :-**

साहेब, माझ्या वॉर्डमध्ये काम आहे. मी कुठचीच जनरल निधी वापरत नाही. फक्त नगरसेवक निधी आणि प्रभाग निधी मधुनच काम करून घेतो.

**मा. आयुक्त :-**

कम्युनिटी सेंटर, वृद्धाश्रम, आधारकेंद्र, डी केयर सेंटर, आरोग्य केंद्र, बालक मंदिर, सिनियर सिटिजन केंद्र, अग्निशमन केंद्र, बालवाड्या, व्यायामशाळा, ग्रंथालय, वाचनालय अशा वेगवेगळ्या योजनेसाठी चार-चार सभासद एकत्र आले. आणि काही वॉर्डमध्ये जर आर.जी. मिळत नसेल. आणि ते शेजारच्या वॉर्डमध्ये असेल तर सर्वांनी मिळून एकत्र येवून निव्वळ आपण काम न दिसणार काम करतो. तर यापुढे तुमच नावपण राहिल. या दृष्टिकोनातुन विचार करावा अशी नम्रतेची विनंती आहे. आणि या बाबीत सर्व कौन्सीलरना आपआपल्या पार्टीच्या टोन्सीलर ला समजावून सांगाव आणि त्या पध्दतीने गटारी, फुटपाथ यावर खर्च न करता अशा पध्दतीने खर्च केलतर महापालिकेत एका वर्षामध्ये आपल्याला इमारती मिळतील. पोलिस चौक्या मिळतील किंवा बालवाड्या मिळतील, या सर्व अंगणवाडी वाचनालय या आर.जी. मध्ये १० टक्क्यामध्ये बांधकाम करता येईल. त्या दृष्टीने सर्व नागरिकांना सुविधा चांगल्याप्रकारे आपण देवू शकतो.

**शरद पाटील :-**

आयुक्त साहेब तुमची सुचना चांगली आहे. हरकत नाही. एक तर आमचे जेवढे ८ वॉर्ड आहेत. त्या ८ वॉर्डमध्ये एकाही ठिकाणी अशी जागा नाही की, तिथे आम्ही बांधू शकतो. दुसरी गोष्ट आमच्या वॉर्डात जर काही काम करायच असेल तर जनरल निधीतुन करून द्याल का? आणि तिसरी गोष्ट अशी की, एखाद्या वॉर्डमध्ये जर आमच नाव लागत असेल तर त्या तिकडच्या नगरसेवकांनी जर ऑब्जेक्शन घेतल तर त्याच काय कराल?

**मा. आयुक्त :-**

त्या वेळेला ऑब्जेक्शन घेण्याचा प्रश्नच येणार नाही. कारण सर्व नगरसेवकांनी मिळून ती योजना केलेली आहे. त्या एरियामध्ये आर.जी. जास्त आहेत. आता घोडबंदर आणि मिरारोड येथे आर.जी जास्त आहे. आपल्या गावठणामध्ये आर.जी. नाही. तर सर्व नगरसेवकांनी मिळून तिथे करायच आहे. ज्यावेळेला वाद उपस्थित झाला होता. उद्घाटन कोण करायच, आम्हाला बरोबर घेतल नाही, नाव कोणाच लावायच? हा प्रश्न आला होता. त्यावेळेला आपण म्हंटल होत की, ज्या वॉर्डातल्या नगरसेवकांची निधी वापरलेली आहे. त्या वॉर्डाच्या नगरसेवकांच नाव लिहू. आता प्रश्न असा आला की, ज्या एरियामध्ये आर.जी. आपल्याला मिळेल. त्या एरियातले सगळे कौन्सीलर मिळून जर करणार असाल आणि निधी मिळत असेल तर ते सर्वांचीच नाव लागणार. आणि सर्वांच्याच नावाने उद्घाटन होणार. तुम्ही निवडून आल्यानंतर तुम्ही सर्व वॉर्डातून आहे. परंतु, प्रत्यक्षात काम करण्यासाठी तुम्ही युझ करू शकता.

**शरद पाटील :-**

साहेब, वॉर्डात काम बाकी असेल तर ते काम कस करायच?

**मा. आयुक्त :-**

काम बाकी असेल तर बघू ना. परंतु तुम्हाला सजेशन सांगितल तुमच्या-तुमच्या पार्टीच्या नगरसेवकांना समजावून सांगुन ग्रुप करून नगरसेवक निधी आणि प्रभाग निधी जर झाली. तर बालवाडी, डे-केअर, सेन्टर सिनियर सिटीजन या योजना प्रत्येक विभागामध्ये आहे.आता मिरारोडमध्ये चार-पाच वेगवेगळे चार-पाच वेगवेगळे इस्टमध्ये घेतल तर ते सुविधा निर्माण होवू शकेल.

**मदन उदितनारायण सिंह :-**

हो पण याच्यावर बंधन टाकू नका.

**मा. आयुक्त :-**

बंधन म्हणजे मी सांगितल ना. मी कम्युनिटी सेंटर, वृद्धाश्रम, आधार केंद्र, डी-केअर सेन्टर, आरोग्य केंद्र, नंतर बालक मंदिर. बालवाडी, सिनियर-सिटिजन, अग्निशमन केंद्र, व्यायाम शाळा आणि वाचनालय.

**अनिल सावंत :-**

मा. आयुक्त साहेब, डी.सी. रूल मध्ये प्रोव्हिजन आहे का? आर.जी. मध्ये हे सगळ करायला.

**मा. आयुक्त :-**

आहे ना. १० टक्के मध्ये.

**अनिल सावंतः-**

असलेल्या एरियाच्या १० टक्के मध्ये.

**मा. आयुक्त :-**

ज्या अर्थी आम्ही सांगतो त्या अर्थी असल्याशिवाय....

**अनिल सावंत :-**

तुम्हाला तो धोरणात्मक निर्णय आहे. तो मा. महासभेमध्ये विषय आणावा लागेल ना.

**मा. आयुक्त :-**

आणणार ना. फक्त तुम्हाला तुमच्या-तुमच्या पार्टीतल्या नगरसेवकांना सांगाव म्हणुन...

**अनिल सावंत :-**

याच्यामध्ये अस आहे की, ज्या नगरसेवकाच्या वॉर्डमध्ये जे काम हेणार आहे. त्या नगरसेवकाची ना हरकत प्रमाणपत्र गरजेच आहे. उद्या बी.जे.पी. चा नगरसेवक येवून माझ्या वॉर्डमध्ये जर काही करत असेल तर माझ ना हरकत लागणार ना.

**मा. आयुक्त :-**

हे बघा. तुमच ना हरकत लागणार. परंतु, तुमची इमारत होण्यासाठी तुमचा निधी कमी पडणार. तुम्ही ४ कौन्सीलरचे......

**अनिल सावंत :-**

आम्ही आमच्या पार्टीचे ४ कॉन्सीलर घेणार ना.

**मा. आयुक्त :-**

घ्याना. यात कसल राजकारण?

**अनिल सावंत :-**

याच्यामध्ये राजकरण होणार.

**मा. आयुक्त :-**

होणार नाही.

**अनिल सावंत :-**

मागच्या वेळेला हा प्रॉब्लेम झाला म्हणुन तर त्याच्यासाठी घेतला.

**मा. आयुक्त :-**

म्हणुन तुम्ही तुमच्या पार्टी लेव्हलला डिसकशन करून काय कुठे घ्यायच? म्हणुन मी सांगितल.

**अनिल सावंत :-**

त्या नगरसेवकाच ना हरकत प्रमाणपत्र पाहिजे. त्या वॉर्डमध्ये जे काम होणार आहे. त्या वॉर्डमधल्या नगरसेवकाच ना हरकत प्रमाणपत्र पाहिजे. नाहीतर कुठचाही नगरसेवक.......

**मा. आयुक्त :-**

एका नगरसेवकाच्या एरियामध्ये ६ आर.जी. असतील. आणि त्यांचा फंड युझ करून देखिल परत पाच आर.जी. शिल्लक असतील तर बाकीचे नगरसेवक इथे करून नाव करता येईल ना.

**अनिल सावंत :-**

करू ना. आम्ही आमच्या पार्टीच्या नगरसेवकांच करू ना.

**मा. आयुक्त :-**

करा ना.

**जुबेर इनामदार :-**

सन्मा. सदस्य सावंत साहेब यांच म्हणन अस आहे की, ज्या क्षेत्रामध्ये काम चालू होणार असेल किंवा ठराविक वॉर्डमध्ये जे आर.जी. आहे. त्या नगरसेवकाचा ना हरकत दाखला घ्या. किंवा दुसऱ्या नगरसेवकाचा निधी तुम्ही वापरणार असणार तर आम्हाला त्याची हरकत नाही. नाहीतर उद्या भांडण होणार.

**मा. आयुक्त :-**

अहो. पण मंजुरीसाठी विषय स्थायी समितीतच येणार आहे.

**अनिल सावंत :-**

त्यावेळी ही कंडीशन टाका.

**मा. आयुक्त :-**

कंडीशन टाकायची जरूरी नाही. स्थायी समितीमध्ये येणार ह्या वेळेला सगळ्या संमतीने एकत्र रक्कम करून इस्टीमेट बनवणार ना.

**अनिल सावंत:-**

त्यावेळी स्थायी समिती सदस्य कोण असतील. त्यांच्या जवळ एवढा दुरदृष्टीपणा नसेल. साहेब, आम्ही भोगलय ना. म्हणून सांगतोय. या वॉर्डमध्ये इंटरफेअरच काम फार होत. त्यामुळे आम्ही मागच्या स्टॅण्डींग मध्ये ठराव पण केलेला. स्थानिक नगरसेवकाच्या मंजूरी शिवाय कुठचाही उद्घाटन करू नये.

**मा. आयुक्त :-**

स्थानिक नगरसेवकांच नाव घेवून बाकीच्यांच पण फंड घ्यायचा. आणि त्यांची ही नावे लावायची.

**अनिल सावंत :-**

हरकत असेल तर.

**मा. आयुक्त :-**

हो. तुमच तुम्ही ठरवा. मी तुम्हाला एक सजेशन केल.

**जुबेर ईनामदार :-**

साहेब, सजेशन फार चांगले आहे. यात कुठला वाद नाही.

**चंद्रकात म्हात्रे :-**

आपल्याला पूर्वी असा नियम होता. की. आर.जी. ची जागा आहे. त्यात काही करायसाठी आपल्याला बिल्डरची किंवा तिथल्या लोकांची परवानगी हवी होती. तर आता परवानगीची आवश्यकता नाही ना.

**मा. आयुक्त :-**

शासनाने असा निर्णय घेतलेला आहे. की. आर.जी. डेव्हलप कोणी केल नसेल आणि डेव्हलप न करता मेन्टेन्सपण करत नसतील तर ती आर.जी ताब्यात घ्यायची.

**अनिल सावंत :-**

साहेब, शांती नगरमध्ये आर.जी. चा मोठा प्रश्न आहे. कुठच्या आर.जी. आहेत कुठच्या नाही ते माहीत नाही.

**मा. आयुक्त :-**

ते आम्ही आता काढायला लावतो.

**अनिल सावंत :-**

आणि त्याच्यावर अतिक्रमण झालेले आहे. प्लीझ ते ताबडतोब हटवून द्या. महापालिकेचे तिथे बोर्ड लावा. आर.जी. आहे.

**मा. आयुक्त :-**
मंजुर सोडून.
**अनिल सावंत :-**
हा ठिक आहे मंजूर सोडून.
**निर्मला सावळे :-**
मा. आयुक्त साहेब, जर एखाद्या फंडातून काम झाल असेल. आणि तिथे नगरसेवका बरोबर पक्षाचाही, पार्टीच नाव लिहिल असेल तर आपण त्याच्यावर कारवाई काय करणार?
**मा. आयुक्त :-**
तुमचे बोर्ड लावताना आपण कॉंग्रेसचे नगरसेवक म्हणत नाही फक्त तुमच नाव लिहितो.
**निर्मला सावळे :-**
जर, इतर पक्षाच्या नगरसेवकांनी लावल असेल तर
**मा. आयुक्त :-**
कुठलही काम झाल्यानंतर पार्टीची नावे लिहित नाही. आमदार असे लिहितो, नाव लिहितो, नगरसेवक लिहितो, पक्ष लिहित नाही.
**निर्मला सावळे :-**
आपल्या माहितीसाठी सांगते, पुनम सागर येथे रस्त्याच्या मध्यभागी वाहतुक बेट तयार केलेल आहे. तसेच नगरसेवकांनी आपल्या पक्षाच, आमदारांच पक्षाच नाव टाकलेल आहे.
**मा. आयुक्त :-**
चूकीच आहे. पक्षाच नाव कुठेच राहता कामा नये.
**निर्मला सावळे :-**
महानगरपालिकेचा जो फंड आहे. तर तो काढून घ्या.
**मा. आयुक्त :-**
पक्षाच नाव कुठेच राहता कामा नये.
**अनिल सावंत :-**
तिथे जे नाव दिलेल आहे. त्या नामकरणाला स्थायी समितीची मान्यता पण नाही. आणि आपल्या महापालिकेने पैसे खर्च करून बांधलेल आहे.
**निर्मला सावळे :-**
साहेब, त्याची किती दिवसात कारवाई होईल.
**मा. आयुक्त :-**
नाव ठेवू पक्षाच नाव काढून टाकू.
**मा. सभापती :-**
सदरचा विषय सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे. पूढील विषय घेण्यांत यावा.
**मदन उदितनारायण सिंह :-**
खांबित साहब, यह जो विषय है जो स्कुल पे सेट बांध सकते है क्या? आपने दुसरे सेट को परवानगी नही दिया था। स्कुल पे सेट नही बांध सकते. लेकिन महापालिकाके अंदर ही आप दुसरे स्कुल के सेट को परमिशन नही देते है ।
**मा. आयुक्त :-**
स्कुल का परमिशन देत नही और पहले ही उनका इललिगल हो तो कैसे दे?
**मदन उदितनारायण सिंह :-**
लिगल है।
**मा. आयुक्त :-**
आप हमको वह दिखाओ।
**मदन उदितनारायण सिंह :-**
सेवन स्केअर ॲकॅडमी को सेट बांधने का परमिशन को नकार दिया था।
**मा. आयुक्त :-**
हमको दिखाओ.
**मदन उदितनारायण सिंह :-**
लेकिन उसको देंगे क्या?
**मा. आयुक्त :-**
देखो इसको युज करनेके लिए बिचमे चार-पाट फुट का हाईट रखना और निचे २ फुट का हाईट कऱना यानी की ह्युमन युज करनेके लिए नही रहेगा। यह कंडीशन के उपर देते है।
**मदन उदितनारायण सिंह :-**
युज के लिए नही मांगे थे। १५ ऑगस्ट जो बरसात मे आता है, तो ध्वजावंदन के लिए मांगा था।

**चंद्रकांत मोदी :-**

साहब वह वाहतुक बेट को स्टॅण्डींग कमिटीने परमिशन दिया नही था। पास नही किया है।

**मा. आयुक्त :-**

पास हुआ होगा।

**चंद्रकांत मोदी :-**

स्टॅंडींग कमिटी मे पास नही हुआ है। मॅडमने पुनम सागरका जो बताया।

**अनिल सावंत :-**

कुठे पास झाल आहे. नामकरण कुठे पास झाल आहे?

**दिपक खांबित :-**

नामकरण कुठे झालय?

**अनिल सावंत :-**

मग, त्याच्यावर कस काय नाव टाकल?

**दिपक खांबित :-**

जी पाटी आहे ना. ती पाटी काढायची. आणि आपला फॉर्मेट जो आहे ना. कोणाची नावे यायला पाहिजे. त्याप्रमाणे टाकायची.

**अनिल सावंत :-**

स्थायी समितीमध्ये नामकरणाचा ठराव पास नाही झाला. आणि त्याच्यावर नाव कस टाकल? त्याच उद्घाटन पण झालय

**दिपक खांबित :-**

परस्पर नाव लावल आहे.

**अनिल सावंत :-**

परस्पर कोणी लावल?

**दिपक खांबीत :-**

नगरसेवकांनी लावल.

**अनिल सावंत :-**

नगरसेवक परस्पर असे काही ही लावू शकतो का?

**मदन उदितनारायण सिंह :-**

चौपाटी पे भी परमिशन नही हुआ फिर भी नामकरण करके उद्घाटन हुआ है।

**मा. आयुक्त :-**

नामकरण किया है लेकिन उसके उपर कॉग्रेस यह सब नही लगाया है।

**मदन उदितनारायण सिंह :-**

यह क्या बोल रहे है नामकरण कैसा किया? अभी यहापर चर्चा क्या हो रही है की, नामकरण कैसा किया?

**मा. आयुक्त :-**

नामकरण करते वक्त उनका यह कहना है की पार्टी नाम नही रहना चाहिए।

**निर्मला सावळे :-**

मा. आयुक्त साहेब, एखाद्या कमानी वरती महापुरूषाच नाव टाकलेल आहे. तेथील नगरसेवकाच ही नाव टाकलेल आहे. तर याच्यामध्ये आपण काही ठरवून दिलेल आहे की, महापुरूषाच नाव जर लहान असेल आणि नगरसेवकाला त्याच्यापेक्षा मोठ नाव पाहिजे किंवा महापुरूषाच मोठ नाव पाहिजे आणि नगरसेवकाच लहान पाहिजे अस काही आहे का? महापुरूषाच नाव लहान अक्षरात लिहिलेल आहे. आपण ही रस्त्याने येता जाता पाहिलेल आहे. आणि नगरसेवकाच मोठ नाव लिहिलेल आहे. तर महापुरूषाच तिथे अवमान होत. तर आपण त्या विषयी काळजीपूर्वक लक्ष द्या. आणि लवकरात लवकर चेंज करून घ्या.

**प्रकरण क्र. ३८ :-**

निविदांना मान्यता देणे बाबत. (सार्व. बांधकाम विभाग)

**ठराव क्र. ३३ :-**

| अ.क्र. | कामाचे नांव / ठेकेदाराचे नांव | अंदाजित खर्च / ठेकेदाराने सादर केलेले दर |
|---|---|---|
| १ | मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील भाईंदर (पूर्व) खारीगांव शाळेकरीता वाढीव पहिला, दुसरा व तिसरा मजल्याचे उर्वरीत बांधकाम करणे. भाग – २<br><br>१) मे. ललित इंटरप्रायजेस | रु. ४९,९९,८००/-<br><br>७४.०० % जास्त दराने |

| | | |
|---|---|---|
| | दर कमी करून<br>(सन २००९ – १० च्या जिल्हादरसुचीतील दरानुसार) | ७०.०० % जास्त दराने<br>(१६.३९ % जास्त दराने) |

| अ.क्र. | कामाचे नांव / ठेकेदाराचे नांव | अंदाजित खर्च / ठेकेदाराने सादर केलेले दर |
|---|---|---|
| २ | भाईंदर (प) येथील महानगरपालिकेच्या शाळेच्या इमारतीवर शेड बांधणे.<br><br>१) मे. साळवी कंन्स्ट्रक्शन<br>२) मे. कल्पतरू इंटरप्रायजेस | रु. १८,४३,७००/-<br><br><br>८.०० % कमी दराने<br>०.०१ % कमी दराने |
| ३ | भाईंदर (पूर्व) ओस्वाल ऑर्नेट पासून युनायटेड पॅलेस पर्यत रस्ता तयार करणे.<br>**मे. गांवदेवी मजूर कामगार सहकारी संस्था मर्या.** | रू. १४,३१,३००/-<br><br>**अंदाजपत्रक दराने** |

वरीलपैकी अ.क्र. २ च्या कामी मे. साळवी कंन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकातील दरापेक्षा ८% कमी दराची निविदास मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र. १ च्या कामाचे अंदाजपत्रकातील दर हे सन २००५ – ०६ या वर्षाच्या दरसुचीतील असून त्यानुसार एकूण रू. ४९,९९,७७७/- रकमेचे अंदाजपत्रक होत आहे.

तथापी सद्यस्थितीत सन २००९ – १० या वर्षाचे जिल्हा दरसुचीतील दर उपलब्ध असून त्यानुसार सदर अंदाजपत्रक रू. ७३,०२,५०९/- रकमेचे असल्याबाबत तांत्रिक सल्लागार मे. आर्चिझम यांनी कळविलेले आहे. प्रत्यक्षात ठेकेदाराने सन २००५ – ०६ या वर्षाच्या जिल्हादरसुचीतील दरानुसार दरवाटाघाटीनंतर ७०.००% जास्त दर सादर केले आहेत. सदर दराची तुलना सन २००९ – १० या वर्षाच्या जिल्हा दरसुचीतील दराशी करता ठेकेदारानी भरलेले दर १६.३९ % जास्त दराची आहे. सदर निविदेस मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र. ३ चे काम तातडीचे असल्याने जिल्हा मजूर सोसायटी कडून आलेल्या शिफारसीनुसार मे. गांवदेवी मजूर कामगार सहकारी संस्था मर्या यांना कार्यादेश देऊन सुरू करण्यात आलेले आहे. सदर निविदेस मान्यता देण्यात येत आहे.

वरील कामी ठेकेदारांना वेळोवेळी देयके प्रदान करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

**सुचक :- श्री. जुबेर इनामदार अनुमोदक :- श्रीम. ग्रिटा फॅरो**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ३९, वातानुकूलीत शीतपेटीमध्ये खाजगी कारणास्तव मृतदेह ठेवणेसाठी दर आकारणेबाबत.

**मदन उदितनारायण सिंह :-**

हमलोग मिरा भाईंदर मे, बॉम्बे मे भी लकडी फ्री देते है। यहा भी लकडी फ्रि देते है। तो यह मोफत ही दिया जाये ना। इनको दर क्यो आकारना है। फ्रि दिया जाये।

**संभाजी पानपट्टे ( उपायुक्त) :-**

यह विषय अलग है।

**नगरसचिव :-**

बॉडी रखनेका है।

**मदन उदितनारायण सिंह :-**

बॉडी रखनेका भी फ्रि मे दिया जाये ना। हम लोग उनके आरोग्य की काळजी लेते है। महापालिका सब देती है। तो मरनेके बाद पैसा क्यो लेने का? वह भी फ्रि किया जाये।

**अनिता पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील वैद्यकिय विभागाने मिरारोड रुग्णालय व टेंबा रुग्णालय येथे अनुक्रमे १६ व २१ शितपेट्या मृतदेह ठेवणेकरिता उपलब्ध केल्या आहेत. सदर शितपेट्यांमध्ये खाजगी कारणास्तव मृतदेह शवपेटीमध्ये ठेवणेकरिता प्रतिदिन (२४ तासांकरिता) रु. २००/- दर आकारण्यात यावेत. सदर मृतदेह मृत्यु दाखला / शवविच्छेदन केल्याचा दाखला असेल तरच शवगृहामध्ये ठेवण्यात येतील.

तसेच बेवारस मृतदेह व काही आपत्ती घडल्यास मृतदेह शवपेटीत ठवण्याकरीता कोणत्याही प्रकारचे दर न आकारणेस ही स्थायी समिती सभा मंजुरी देत आहे.

**चंद्रकांत मोदी :-**

इस ठराव को मेरा अनुमोदन है।

**संभाजी पानपट्टे (उपायुक्त) :-**

नैसर्गिक आपत्ती, दारिद्रय रेषेखालील बेवारिस लोक असतात त्यांना फुकट आहे. आणि जे धनिक लोक आहेत. फॉरेनर असतात. १०-१५ दिवस त्यांना शव ठेवायच असेल त्यांनाच आपण चार्ज लावणार आहे.

**मा. सभापती :-**

सदरचा ठराव सर्वांनुमते मंजूर करण्यात येत आहे. पुढील विषय घेण्यात यावा.

**प्रकरण क्र. ३९ :-**

वातानुकूलीत शीतपेटीमध्ये खाजगी कारणास्तव मृतदेह ठेवणेसाठी दर आकारणेबाबत.

**ठराव क्र. ३४ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील वैद्यकिय विभागाने मिरारोड रुग्णालय व टेंबा रुग्णालय येथे अनुक्रमे १६ व २१ शितपेट्या मृतदेह ठेवणेकरिता उपलब्ध केल्या आहेत. सदर शितपेट्यांमध्ये खाजगी कारणास्तव मृतदेह शवपेटीमध्ये ठेवणेकरिता प्रतिदिन (२४ तासांकरिता) रु. २००/- दर आकारण्यात यावेत. सदर मृतदेह मृत्यु दाखला / शवविच्छेदन केल्याचा दाखला असेल तरच शवगृहामध्ये ठेवण्यात येतील.

तसेच बेवारस मृतदेह व काही आपत्ती घडल्यास मृतदेह शवपेटीत ठवण्याकरीता कोणत्याही प्रकारचे दर न आकारणेस ही स्थायी समिती सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- सौ. अनिता पाटील अनुमोदक :- श्री. चंद्रकांत मोदी**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ४०, मिरारोड येथील रक्तपेढीसाठी मागविण्यात आलेल्या फेर निवीदांचे दर मंजूर करणेबाबत.

**अनिल सावंत :-**

प्रशासनाने दिलेल्या गोषवाऱ्यानुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आरक्षण क्र. १९२, १९३ मध्ये रूग्णालयाच्या इमारतीत तळ मजल्यावर रक्तपेढी सुरू करण्यासाठी मे. नवजीवन मेडिकल रिलीफ ॲण्ड रिसर्च फाऊंडेशन यांनी सादर केलेल्या कमी दराच्या निविदेस मा. स्थायी समिती सभा खालीलप्रमाणे अटीशर्तीच्या अधीन राहून मंजूरी देत आहे.

१) कार्यादेशापासून चार महिन्याचे आत रक्तपेढी सुरू करण्यात यावी.
२) उपकरणे नादुरूस्त झाल्यास दुरूस्ती तत्काळ करून घ्यायची जबाबदारी संस्थेची राहील. तसेच कुठल्याही परिस्थितीत रूग्णास रक्तपुरवठा करण्यात यावा.
३) रक्तपेढी चालविण्यासाठी संस्थेने योग्य पात्रतेचे FDA Approved अधिकारी व कर्मचारी वर्ग यांची नेमणूक करावी.
४) सदर रक्तपेढी चालविण्याची मुदत १० वर्षे राहील. त्यानंतर काम समाधानकारक वाटल्यास मुदतवाढ देण्याचे अधिकार मा. आयुक्त सो. यांना राहील.
५) रक्तपेढी साहित्य उपकरणे व कर्मचारी वर्ग भरती केल्यानंतर आवश्यक परवाने घेण्याची जबाबदारी संस्थेची राहील.
६) उच्च प्रतीचे रक्त गरजु रूग्णास कोणत्याही परिस्थितीत पुरविण्याची जबाबदारी संस्थेची राहील.
७) रक्तपेढीबाबत येणारे सर्व आधुनिक तंत्रज्ञान आणण्याची जबाबदारी संस्थेची राहील.
८) रक्तपेढी चालविण्यासाठी महानगरपालिकेतर्फे जागा, नळजोडणी, अखंडीत विद्युत पुरवठा, दुरध्वनी जोडणे, वातानुकुलीन यंत्रणा पुरवठा केले जाईल. याबाबतचे येणारे मासिक व वार्षिक देयक मात्र संस्थेस भरावे लागेल.
९) शासकीय नियमाचे उल्लघंन झाल्यास अथवा जागेचा दूरउपयोग झाल्यास झालेला करार रद्द करण्यात येईल.
१०) रक्तपेढीसाठी अन्न व औषध प्रशासनाने तयार केलेल्या नियमामध्ये सदर रक्तपेढी चालविली पाहिजे. त्या नियमांचे उल्लंघन केल्यास संपूर्णपणे सदर संस्था जबाबदार राहील.
११) महानगरपालिकेने वेळोवेळी केलेल्या सुचनांचे उल्लंघन केल्यास करारनामा रद्द करण्यात येईल.
१२) रक्तपेढी चालविण्यास लागणारा अत्यावश्यक असा परवाना व नुतनीकरण अन्न व औषध प्रशासन यांच्याकडून आणण्याची संपूर्ण जबाबदारी सदर संस्थेवर राहील.
१३) सदर परवाना प्राप्त करण्यासाठी लागणाऱ्या सर्व कागद पत्राची पुर्तता सदर संस्थेला करावयाची आहे.

१४) रक्तपेढीस लागणाऱ्या सर्व यंत्रांची देखभाल सदर संस्थेला करावयाची आहे. त्यासाठी लागणारा सर्व प्रकारचा खर्च सदर संस्थेलाच करावयचा आहे. यंत्राची दुरूस्ती लवकरात लवकर करून घ्यायची जबाबदारी सदर संस्थेवर राहील. यंत्र नादुरूस्त असताना कोणतीही दुर्घटना घडल्यास त्याची जबाबदारी संस्थेवर राहील.

१५) रक्तपेढीतील यंत्रांसाठी व वेळोवेळी लागणाऱ्या रसायनांची, द्रावणांची तसेच इतर आवश्यक साहित्य खरेदी संस्थेला करावयाची आहे.

१६) निवडलेल्या प्रत्येक कर्मचाऱ्याचे त्यांच्या पदानुसार व किमान वेतन कायद्यानुसार मासिक पगार देणे सदर संस्थेस बंधनकारक राहील.

१७) रक्तपेढीत काम करावयास निवडलेल्या प्रत्येक उमेदवाराचे कामाचे तास, कामाची वेळ ठरविण्याचा अधिकारी संस्थेवर राहील.

१८) रक्तपेढीतील कर्मचाऱ्यांच्या तांत्रिक किंवा लेखी चुकाच्या परिणामाला, कायदेशीर कारवाईला संस्था जबाबदार राहील. या संबंधीची कुछलीही जबाबदारी कुठल्याही प्रमाणात महानगरपालिका स्विकारणार नाही.

१९) अन्न व औषध प्रशासनाच्या तपासणीला सामोरे जायची संपूर्ण जबाबदारी सदर संस्थेवर राहील. त्या तपासणीत आढळणाऱ्या त्रृटींना परिपूर्ण करण्याची संपूर्ण जबाबदारी सदर संस्थेवर राहील.

२०) अकस्मित होणाऱ्या, उद्‌भवणाऱ्या संकटाना म्हणजे बंद, दंगल, अतिवृष्टी, संप या सारख्या परिस्थितींना सामोरे जायची संपूर्ण जबाबदारी सदर संस्थेवर राहील.

२१) रक्तदान शिबीर आयोजित करून, रक्त जमा करण्याची संपूर्ण जबाबदारी सदर संस्थेवर राहील. रक्तदान शिबिराला लागणारी साधन सामुग्री, मनुष्यबळ, वाहन व इतर आवश्यक साहित्य संस्थेनेच खरेदी करावे.

२२) रक्तपेढीत जमा होणाऱ्या रक्तावर नियमानुसार करावयाला लागणाऱ्या विविध चाचण्यासाठी उच्च व आधुनिक तंत्र व यंत्र वापरण्याची जबाबदारी सदर संस्थेवर रहील.

२३) दुषित व खराब झालेले व न वापरलेले रक्त व रक्तघटकांची बायोमेडिकल वेस्ट ॲक्ट १९९८ नुसार विल्हेवाट लावण्याची सर्व जबाबदारी सदर संस्थेवर राहील.

२४) अन्न व औषध प्रशासनाच्या नियमानुसार रक्तपेढी सर्व प्रकारचे अहवाल ठेवण्याची जबाबदारी सदर संस्थेवर राहील. अहवाल गहाळ किंवा खराब झाल्यास सदर संस्थेला पूर्णपणे जबाबदार धरण्यात येईल.

२५) रक्तपेढी सुरू झाल्यानंतर होणाऱ्या सर्व प्रकारच्या अंतर्गत दुरूस्तीचा खर्च सदर संस्थेला करावयाचा आहे.

२६) रक्तपेढीच्या नित्य वापरावयाच्या गोष्टी उदा. रक्तांच्या पिशव्या चाचणी संच, रसायन, द्रावणे यांचा पुरेसा साठा ठेवण्याची सर्व जबाबदारी सदर संस्थेवर राहील.

२७) रक्तपेढी चालविताना त्याची संपूर्ण नैतिक जबाबदारी कायदेशीररित्या सदर संस्थेवर राहील.

२८) अशासकीय संस्थेने रू. १ लाखाची बँक गॅरेंटी महापालिकेस देणे बंधनकारक आहे.

२९) संस्थेने महापालिकेची जागा वापराबद्दलचे रू. २५०००/- मनपा फंडात प्रत्येक महिन्याच्या १० तारखेच्या आत भरावे.

३०) थॅलेसेमिया, रक्ताचा कर्करोग व बीपीएल दाखला असणाऱ्यांना संस्थेने मोफत रक्तपुरवठा करावा.

३१) भविष्यात केंद्र शासन, राज्य शासन, महानगरपालिकेने वेळोवेळी केलेले कायदे, आदेश पाळणे संस्थेस बंधनकारक राहील.

३२) रक्तपेढीतून दिलेल्या रक्तात काहीही दोष आढळल्यास किंवा रक्त खराब आहे असे सिध्द झाल्यास तीन नोटीसीनंतर आपल्याशी झालेला करारनामा रद्द करण्यात येईल, व बँक गॅरेंटी जप्त करण्यात येईल. तसेच यानंतर होणाऱ्या सर्व कार्यवाहीला संस्था जबाबदार राहील.

३३) या करार कालावधीत कराराच्या अमंलबजावणी संदर्भात काही तंटा उद्‌भवल्यास तो भारतीय लवाद कायदा १९४८ अंतर्गत सोडविण्यात यावा.

**ग्रिटा फॅरो :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

सदर ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ४० :-**

मिरारोड येथील रक्तपेढीसाठी मागविण्यात आलेल्या फेर निवीदांचे दर मंजूर करणेबाबत.

**ठराव क्र. ३५ :-**

प्रशासनाने दिलेल्या गोषवाऱ्यानुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आरक्षण क्र. १९२, १९३ मध्ये रूग्णालयाच्या इमारतीत तळ मजल्यावर रक्तपेढी सुरू करण्यासाठी मे. नवजीवन मेडिकल रिलीफ ॲण्ड रिसर्च फाऊंडेशन यांनी सादर केलेल्या कमी दराच्या निविदेस मा. स्थायी समिती सभा खालीलप्रमाणे अटीशर्तीच्या अधीन राहून मंजूरी देत आहे.

१) कार्यादेशापासून चार महिन्याचे आत रक्तपेढी सुरू करण्यात यावी.

२) उपकरणे नादुरूस्त झाल्यास दुरूस्ती तत्काळ करून घ्यायची जबाबदारी संस्थेची राहील. तसेच कुठल्याही परिस्थितीत रूग्णास रक्तपुरवठा करण्यात यावा.

३) रक्तपेढी चालविण्यासाठी संस्थेने योग्य पात्रतेचे FDA Approved अधिकारी व कर्मचारी वर्ग यांची नेमणूक करावी.

४) सदर रक्तपेढी चालविण्याची मुदत १० वर्षे राहील. त्यानंतर काम समाधानकारक वाटल्यास मुदतवाढ देण्याचे अधिकार मा. आयुक्त सो. यांना राहील.

५) रक्तपेढी साहित्य उपकरणे व कर्मचारी वर्ग भरती केल्यानंतर आवश्यक परवाने घेण्याची जबाबदारी संस्थेची राहील.

६) उच्च प्रतीचे रक्त गरजु रूग्णास कोणत्याही परिस्थितीत पुरविण्याची जबाबदारी संस्थेची राहील.

७) रक्तपेढीबाबत येणारे सर्व आधुनिक तंत्रज्ञान आणण्याची जबाबदारी संस्थेची राहील.

८) रक्तपेढी चालविण्यासाठी महानगरपालिकेतर्फे जागा, नळजोडणी, अखंडीत विद्युत पुरवठा, दुरध्वनी जोडणे, वातानुकुलीन यंत्रणा पुरवठा केले जाईल. याबाबतचे येणारे मासिक व वार्षिक देयक मात्र संस्थेस भरावे लागेल.

९) शासकीय नियमाचे उल्लघंन झाल्यास अथवा जागेचा दूरउपयोग झाल्यास झालेला करार रद्द करण्यात येईल.

१०) रक्तपेढीसाठी अन्न व औषध प्रशासनाने तयार केलेल्या नियमामध्ये सदर रक्तपेढी चालविली पाहिजे. त्या नियमांचे उल्लंघन केल्यास संपूर्णपणे सदर संस्था जबाबदार राहील.

११) महानगरपालिकेने वेळोवेळी केलेल्या सुचनांचे उल्लंघन केल्यास करारनामा रद्द करण्यात येईल.

१२) रक्तपेढी चालविण्यास लागणारा अत्यावश्यक असा परवाना व नुतनीकरण अन्न व औषध प्रशासन यांच्याकडून आणण्याची संपूर्ण जबाबदारी सदर संस्थेवर राहील.

१३) सदर परवाना प्राप्त करण्यासाठी लागणा-या सर्व कागद पत्राची पुर्तता सदर संस्थेला करावयाची आहे.

१४) रक्तपेढीस लागणा-या सर्व यंत्रांची देखभाल सदर संस्थेला करावयाची आहे. त्यासाठी लागणारा सर्व प्रकारचा खर्च सदर संस्थेलाच करावयचा आहे. यंत्राची दुरूस्ती लवकरात लवकर करून घ्यायची जबाबदारी सदर संस्थेवर राहील. यंत्र नादुरूस्त असताना कोणतीही दुर्घटना घडल्यास त्याची जबाबदारी संस्थेवर राहील.

१५) रक्तपेढीतील यंत्रांसाठी व वेळोवेळी लागणा-या रसायनांची, द्रावणांची तसेच इतर आवश्यक साहित्य खरेदी संस्थेला करावयाची आहे.

१६) निवडलेल्या प्रत्येक कर्मचा-याचे त्यांच्या पदानुसार व किमान वेतन कायद्यानुसार मासिक पगार देणे सदर संस्थेस बंधनकारक राहील.

१७) रक्तपेढीत काम करावयास निवडलेल्या प्रत्येक उमेदवाराचे कामाचे तास, कामाची वेळ ठरविण्याचा अधिकारी संस्थेवर राहील.

१८) रक्तपेढीतील कर्मचा-यांच्या तांत्रिक किंवा लेखी चुकाच्या परिणामाला, कायदेशीर कारवाईला संस्था जबाबदार राहील. या संबंधीची कुछलीही जबाबदारी कुठल्याही प्रमाणात महानगरपालिका स्विकारणार नाही.

१९) अन्न व औषध प्रशासनाच्या तपासणीला सामोरे जायची संपूर्ण जबाबदारी सदर संस्थेवर राहील. त्या तपासणीत आढळणा-या त्रृटींना परिपूर्ण करण्याची संपूर्ण जबाबदारी सदर संस्थेवर राहील.

२०) अकस्मित होणा-या, उद्‌भवणा-या संकटाना म्हणजे बंद, दंगल, अतिवृष्टी, संप या सारख्या परिस्थितींना सामोरे जायची संपूर्ण जबाबदारी सदर संस्थेवर राहील.

२१) रक्तदान शिबीर आयोजित करून, रक्त जमा करण्याची संपूर्ण जबाबदारी सदर संस्थेवर राहील. रक्तदान शिबिराला लागणारी साधन सामुग्री, मनुष्यबळ, वाहन व इतर आवश्यक साहित्य संस्थेनेच खरेदी करावे.

२२) रक्तपेढीत जमा होणा-या रक्तावर नियमानुसार करावयाला लागणा-या विविध चाचण्यासाठी उच्च व आधुनिक तंत्र व यंत्र वापरण्याची जबाबदारी सदर संस्थेवर रहील.

२३) दुषित व खराब झालेले व न वापरलेले रक्त व रक्तघटकांची बायोमेडिकल वेस्ट ॲक्ट १९९८ नुसार विल्हेवाट लावण्याची सर्व जबाबदारी सदर संस्थेवर राहील.

२४) अन्न व औषध प्रशासनाच्या नियमानुसार रक्तपेढी सर्व प्रकारचे अहवाल ठेवण्याची जबाबदारी सदर संस्थेवर राहील. अहवाल गहाळ किंवा खराब झाल्यास सदर संस्थेला पूर्णपणे जबाबदार धरण्यात येईल.

२५) रक्तपेढी सुरू झाल्यानंतर होणा-या सर्व प्रकारच्या अंतर्गत दुरूस्तीचा खर्च सदर संस्थेला करावयाचा आहे.

२६) रक्तपेढीच्या नित्य वापरावयाच्या गोष्टी उदा. रक्तांच्या पिशव्या चाचणी संच, रसायन, द्रावणे यांचा पुरेसा साठा ठेवण्याची सर्व जबाबदारी सदर संस्थेवर राहील.

२७) रक्तपेढी चालविताना त्याची संपूर्ण नैतिक जबाबदारी कायदेशीररित्या सदर संस्थेवर राहील.

२८) अशासकीय संस्थेने रू. १ लाखाची बँक गॅरेंटी महापालिकेस देणे बंधनकारक आहे.

२९) संस्थेने महापालिकेची जागा वापराबद्दलचे रू. २५०००/- मनपा फंडात प्रत्येक महिन्याच्या १० तारखेच्या आत भरावे.

३०) थॅलेसेमिया, रक्ताचा कर्करोग व बीपीएल दाखला असणा-यांना संस्थेने मोफत रक्तपुरवठा करावा.

३१) भविष्यात केंद्र शासन, राज्य शासन, महानगरपालिकेने वेळोवेळी केलेले कायदे, आदेश पाळणे संस्थेस बंधनकारक राहील.

३२) रक्तपेढीतून दिलेल्या रक्तात काहीही दोष आढळल्यास किंवा रक्त खराब आहे असे सिध्द झाल्यास तीन नोटीसीनंतर आपल्याशी झालेला करारनामा रद्द करण्यात येईल, व बँक गॅरेंटी जप्त करण्यात येईल. तसेच यानंतर होणाऱ्या सर्व कार्यवाहीला संस्था जबाबदार राहील.

३३) या करार कालावधीत कराराच्या अमंलबजावणी संदर्भात काही तंटा उद्भवल्यास तो भारतीय लवाद कायदा १९४८ अंतर्गत सोडविण्यात यावा.

**सुचक :- श्री. अनिल सावंत** **अनुमोदक :- श्रीम. ग्रिटा फॅरो**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ४१, भाईंदर (पश्चिम), भाईंदर (पूर्व), मिरारोड ते चेणा, मुर्धा ते उत्तन या विभागातील बाजार बोली पध्दतीने स्विकारणे बाबत (१२ महिन्याकरिता)

**जुबेर इनामदार :-**

मा. सभापती साहेब आता बाजाराचा लिलावाचा विषय आलेला आहे. तर काही लोकांबरोबर चर्चा झाली असे म्हणणे आहे की, ऑफीशियली २५ रू. करून घ्या. आणि तुम्हाला जर जमल तर चर्चा करता आली तर चर्चा करा. त्याच्याबरोबर उत्पन्न सुध्दा वाढवून मिळेल. त्यांना ऑफीशिय़ली तरतुद दिलेली आहे.

**शरद पाटील :-**

साहेब, ठेकेदार बि.पी. रोड, नवघर रोडला ठेकेदार अजून वसुली करतात का?

**प्रविण पाटील :-**

सन्मा. सदस्य जुबेर जी तुम्ही म्हणता २५ रू. द्या पण आपण जी निविदा त्यांच्याप्रमाणे दिलेली आहे ती २० रू. च्या प्रमाणे ठरवली आहे.

**शरद पाटील :-**

निविदा वाढवली ना. आता ते झाल. त्याच्यात कुठे वाढवणार?

**प्रविण पाटील :-**

कस वाढवणार? ठेका मंजूर झालेला आहे.

**मा. आयुक्त :-**

आपण आता काय करता एकूण वसुली ३ कोटी ७५ लाख रू. आहे. २० रू. ने ३ कोटी ७५ लाख रू. तर २५ रू. ने काय काढायच?

**शरद बेलवटे :-**

४ कोटी ७० लाख रू. होतात.

**मा. आयुक्त :-**

४ कोटी ७० लाख रू. तर तयार आहे का विचारून घ्या. त्यांना लगेच बोलवा.

**मा. सभापती :-**

हा विषय थोडा वेळासाठी बाजूला ठेवून पुढील विषय घेण्यात यावा.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ४१ थोड्यावेळासाठी तहकुब करतो आणि प्रकरण क्र. ४२ घेतो. प्रकरण क्र. ४२, महापालिकेच्या वाहनांच्या लिलावाद्वारे विक्री केल्याबाबत.

**अनिल सावंत :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची १० वर्षापेक्षा जास्त कालावधीची एकूण १५ वाहनांचा लिलावाद्वारे विक्री करणेकरीता दि. २९/०६/२०१० रोजीच्या मा. महासभेत याबाबत चर्चा करुन सर्वानुमते ठराव क्र. १५ दि. २९/०६/२०१० अन्वये एकुण १५ वाहने विक्री करणेबाबत आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मा. महासभेने दिलेली आहे.

त्यानुसार दि. १३/०७/२०१० रोजी मा. आयुक्त सो. यांच्या दालनात बोली पध्दतीने जाहिर लिलाव ठेवण्यात आला होता. सदरच्या लिलावात २७ जणांनी निविदा फॉर्म घेतले व एकूण २२ जणांनी बोली लिलावात भाग घेतला.

सदर लिलावात मा. आयुक्त सो. यांच्या दालनात मा. आयुक्त सो. समवेत मा. महापौर, मा. उपमहापौर, मा. सभागृह नेता, मा. विरोधी पक्षनेता, मा. सभापती, स्थायी समिती, मा. सदस्य, स्थायी समिती, मा. सर्व गटनेते यांना बोलविण्यांत आले होते.

एकूण १५ वाहनांची देकार रु. ५,२०,०००/- पासुन सुरुवात झाली. सर्वात जास्त बोली मे. सिमरन इंटरप्रायजेस यांनी रु. १७,००,०००/- बोली करण्यात आली. तरी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ अन्वये केलेल्या लिलावाच्या प्राप्त रक्कम रु. १७,००,०००/- मान्यता मिळणेस ही सभा मंजुरी देत आहे.

**बर्नड डिमेलो :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

सदर ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे. पुढील विषय घेण्यात यावा.

**प्रकरण क्र. ४२ :-**

महापालिकेच्या वाहनांच्या लिलावाद्वारे विक्री केल्याबाबत.

**ठराव क्र. ३७ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची १० वर्षापेक्षा जास्त कालावधीची एकुण १५ वाहनांचा लिलावाद्वारे विक्री करणेकरीता दि. २९/०६/२०१० रोजीच्या मा. महासभेत याबाबत चर्चा करुन सर्वानुमते ठराव क्र. १५ दि. २९/०६/२०१० अन्वये एकुण १५ वाहने विक्री करणेबाबत आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मा. महासभेने दिलेली आहे.

त्यानुसार दि. १३/०७/२०१० रोजी मा. आयुक्त सो. यांच्या दालनात बोली पध्दतीने जाहिर लिलाव ठेवण्यात आला होता. सदरच्या लिलावात २७ जणांनी निविदा फॉर्म घेतले व एकूण २२ जणांनी बोली लिलावात भाग घेतला.

सदर लिलावात मा. आयुक्त सो. यांच्या दालनात मा. आयुक्त सो. समवेत मा. महापौर, मा. उपमहापौर, मा. सभागृह नेता, मा. विरोधी पक्षनेता, मा. सभापती, स्थायी समिती, मा. सदस्य, स्थायी समिती, मा. सर्व गटनेते यांना बोलविण्यांत आले होते.

एकूण १५ वाहनांची देकार रु. ५,२०,०००/- पासुन सुरुवात झाली. सर्वात जास्त बोली मे. सिमरन इंटरप्रायजेस यांनी रु. १७,००,०००/- बोली करण्यात आली. तरी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ अन्वये केलेल्या लिलावाच्या प्राप्त रक्कम रु. १७,००,०००/- मान्यता मिळणेस ही सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. अनिल सावंत** **अनुमोदक :- श्री. बर्नड डिमेलो**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ४३, 'मिरा भाईंदर परिवहन उपक्रमाच्या' बसेस सार्वजनिक व खाजगी सहभागातून चालविणे करिता प्राप्त निविदांपैकी कमी दराच्या निविदेस मंजूरी देणेबाबत.

**जुबेर इनामदार :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाची स्थापना मा. महासभा दि. २०/०१/२००५ रोजी ठराव क्र. ६२ अन्वये करणेत आलेली होती. तद्नंतर मा. महासभा दि. १८/०२/२००५ ठराव क्र. ७२ अन्वये परिवहन समितीची स्थापना करण्यात आली.

परिवहन समिती सभा दि. ०४/०६/२००५ ठराव क्र. ०५ अन्वये परिवहन उपक्रम खाजगी तत्वावर चालविण्याची मंजुरी देण्यात आली. परिवहन उपक्रमाने निविदा प्रक्रिया करुन प्रती कि.मी. दर मागविले, त्यामध्ये एकूण तीन निविदा धारकांनी प्रत्यक्ष भाग घेतला. सर्वात कमी दर मे. महालक्ष्मी कृपा इन्फ्रा. प्रा. लि. यांचे प्रती कि.मी. दर रु. १९/- प्रमाणे निश्चित करण्यात आले व दि. १५/०९/२००५ पासून मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाची बस सेवा सुरु झाली.

सन २००५ ते आजपर्यंत परिवहन उपक्रम चालविण्यासाठी महानगरपालिकेकडून मिळालेले अनुदान खालीलप्रमाणे आहे.

**आकडे लाखात**

| २००५-०६ | २००६-०७ | २००७-०८ | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ (माहे जून पर्यंत) | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| ५५.५४ | १२०.०० | १७०.०० | १०५.०० | २२५.०० | ६०.०० | **७३५.५४** |

मागील पाच वर्षामध्ये मिळालेले अनुदान पाहता ७.३५ कोटी एवढे अनुदान मिरा भाईंदर महानरपालिकेकडून परिवहन सेवा चालविण्यासाठी परिवहन उपक्रमाला दिलेले आहे. वरील बाबींचा विचार करता परिवहन उपक्रमास होणारा तोटा हा वाढत चाललेला आहे असे दिसून येते.

सन २००९ या वर्षात केंद्र शासनाची JNNURM योजने अंतर्गत शहर परिवहनसाठी बसेस उपलब्ध करुन घेणेसाठी मा. स्थायी समिती सभा दि. ०४/०५/२००९, ठराव क्र. ०१ अन्वये मे. अर्बन मास ट्रांन्झिट कंपनी यांचे कडून २५० बसेस करीता डी.पी.आर. (Detail Project Report) बनवून केंद्र शासनाकडे पाठविण्यात आला. सदर डी.पी.आर. ला अनुसरुन केद्रशासनाकडून मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमासाठी पहिल्या टप्प्यात ५० बसेससाठी ११ कोटी रुपये मंजूर केलेले आहेत.

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या सद्य स्थितीमध्ये मे. महालक्ष्मी कृपा इंन्फ्रा. प्रा. लि. यांचे मार्फत भाडे तत्वावर चालू असणाऱ्या सर्व बसेस शासकीय नियमानूसार घसारा मूल्य वजा करून संबधित ठेकेदाराने हस्तातरण करून घ्यावयाच्या आहेत हयाची सर्व रक्कम (१००%) ठेकेदाराने अदा करावयाची आहे.

केंद्र शासनाच्या JNNURM योजने अंतर्गत ५० टक्के रक्कम महानगरपालिका, ३५ टक्के रक्कम केंद्र शासन व १५ टक्के रक्कम राज्य शासन या प्रमाणात निधी उपलब्ध होणार आहे. ५० बसेस खरेदी करण्यासाठी प्रकल्प अहवालानुसार (LED, Multiplex Wiring, GPS वगळून) किंमत रु. ९,८८,७८,८००/- (अक्षरी नऊ कोटी अठ्ठयाऐंशी लाख अठ्ठयाहत्तर हजार आठशे मात्र) एवढा खर्च येणार आहे. JNNURM च्या नियमावलीनुसार ५० टक्के रक्कम म्हणजेच रु. ४,९४,३९,४००/- (अक्षरी चार कोटी चौऱ्यान्नव लाख एकोणचाळीस हजार चारशे मात्र) एवढी रक्कम महानगरपालिकेला स्वतः गुंतवणूक करणे आवश्यक आहे व उर्वरीत रक्कम रु. ४,९४,३९,४००/- शासनाकडून अनुदान स्वरुपात प्राप्त होणार आहे.

M.B.M.T. ने केंद्र शासनाला सादर केलेल्या D.P.R. नुसार उर्वरित १५० बसेस मंजूर झाल्यानंतर या साठी केंद्र शासनाकडून अनुदान (५०%) उपलब्ध करून दिले नाही तर संपूर्ण १००% खर्च हा ठेकेदारास करावा लागणार आहे, जर केंद्र शासनाने अनुदान उपलब्ध करून दिले तर त्या प्रमाणात रॉयल्टी सुद्दा ठेकेदाराने वाढवून देणे क्रमप्राप्त आहे.

| अ. क्र. | तपशिल | शासनाकडून उपलब्ध होणारे अनुदान | ठेकेदाराकडून P.P.P. माध्यमातून उपलब्ध होणारी रक्कम |
|---|---|---|---|
| १ | सद्य. स्थितीत M.B.M.T. च्या चालू असणाऱ्या बसेस हस्तातरण करणे. | - | १००% |
| २ | JNNURM अंतर्गत ५० बसेस | ५०% | ५०% |
| ३ | भविष्यात D.P.R. नूसार उर्वरित १५० बसेस खरेदी बाबत. | ५०% | ५०% |
| ४ | भविष्यात ५० टक्के अनुदान उपलब्ध झाले नाही तर D.P.R. नूसार उर्वरित १५० बसेस खरेदी बाबत. | - | १००% |

सद्यस्थितीमध्ये महानगरपालिकेचा परिवहन उपक्रम चालविण्यासाठी महानगरपालिका अनुदान उपलब्ध करुन देत आहे व एकदा एवढी मोठी रक्कम परिवहन उपक्रमासाठी गुंतवणूक करणे महानगरपालिकेची आर्थिक स्थिती पाहता शक्य नाही. यासाठी महानगरपालिकेने केंद्र शासनाच्या JNNURM योजने अंतर्गत येणाऱ्या बसेस मार्गस्थ करण्याच्या बाबत मा. महासभा दि. ११/०२/२०१०, ठराव क्र. ५१ नुसार पी.पी.पी. (सार्वजनिक खाजगी सहभाग) या तत्वावर चालविण्यासाठी मंजुरी देण्यात आली.

मा. महासभेच्या धोरणात्मक निर्णयानुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेने पी.पी.पी. च्या माध्यमातून बसेस मार्गस्थ करणे या करीता दै. महाराष्ट्र टाईम्स व हिंदुस्थान टाईम्स या दोन वृत्तपत्रामधून दि. ०४/०६/२०१० रोजी निविदा प्रसिद्ध केली होती. हा निविदा कालावधी दि. ०५/०६/२०१० ते २२/०६/२०१० पर्यंत दु. १.०० वाजेपर्यंत होता व निविदा भरणेपूर्वीची बैठक दि. २२/०६/२०१० रोजी संध्या. ४.३० वाजता होती.

निविदा घेण्याच्या मुदतीत खालील नमूद केलेल्या ठेकेदारांनी E-Tendering द्वारे निविदा फॉर्मची रक्कम भरुन निविदा उपलब्ध करुन घेतल्या.

१) मे. कोनार्क इन्फ्रास्ट्रक्चर लि., उल्हासनगर
२) मे. केस्ट्रेल इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि., उल्हासनगर
३) मे. इगल कन्स्ट्रक्शन कंपनी, उल्हासनगर

दि. २२/०६/२०१० रोजी संध्या ६.३० वाजता निविदा धारकाची बैठक मा. आयुक्त सो., यांचे अध्यक्षतेसाठी आयुक्त कार्यालयात झाली. त्यामध्ये निविदाकारांनी लेखी व तोंडी स्वरुपात निविदेतील अटी-शर्ती व अन्य अडचणी बाबत चर्चा केली. याबाबत सविस्तर चर्चा करुन मा. आयुक्त सो., यांनी अंतिम निर्णय दिले. निविदा भरणेपूर्वीची

बैठकीतील मुद्दे हा निविदेचा भाग असल्यामुळे याबाबत सर्व निविदा धारकास E-mail द्वारे व लेखी स्वरुपात पत्राने मा. आयुक्त – मिरा भाईंदर महानगरपालिका यांचा निर्णय कळविण्यात आला. या निविदा पूर्व बैठकीसाठी खालील ठेकेदार उपस्थित होते.

१) मे. कोनार्क इन्फ्रास्ट्रक्चर लि., उल्हासनगर
२) मे. केस्ट्रेल इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि., उल्हासनगर
३) मे. इगल कन्स्ट्रक्शन कंपनी, उल्हासनगर

दि. २९/०६/२०१० रोजी निविदा स्विकारणेची अंतिम तारीख होती, परंतु या निविदा धारकांना बँकेकडून EMD भरतांना अडचणी निर्माण झाल्यामुळे यापैकी एक निविदाकार मे. केस्ट्रेल इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि., यांनी निविदा स्विकारण्याची मुदत एक दिवसाने वाढवावी अशी लेखी विनंती केली, त्याप्रमाणे मुदत एक दिवस वाढवून दि. ३०/०६/२०१०, संध्या. ३.०० वा. पर्यंत वाढविण्यात आली.

दि. ३०/०६/२०१०, संध्या. ५.३० वा. सर्व निविदा धारक व मा. उपायुक्त तथा परिवहन व्यवस्थापक, मुख्यलेखाधिकारी, मुख्य लेखापरिक्षक व सहा. आयुक्त (परिवहन) यांचे समक्ष E-Tendering द्वारे प्राप्त निविदा उघडण्यात आल्या. तांत्रीक बाबी संबधी सर्व मुद्यांची छाननी मा. उपायुक्त सो., मुख्य लेखाधिकारी सो., मा. मुख्य लेखापरिक्षक व सहा. आयुक्त यांनी करुन घेतली असता तीनही निविदा धारक १) मे. कोनार्क इन्फ्रास्ट्रक्चर लि., उल्हासनगर २) मे. केस्ट्रेल इन्फ्रास्ट्रक्वर प्रा.लि., उल्हासनगर ३) मे. इगल कन्स्ट्रक्शन कंपनी, उल्हासनगर यांची सर्व कागदपत्रे योग्य असल्याचे दिसून आले. मा. छाननी समितीची सर्वांच्या शिफारशीनुसार दुसऱ्या देकार बाबतचे लिफाफा उघडण्यात आला असता त्यामध्ये खालीलप्रमाणे देकार आला.

| अ.क्र. | निविदा धारकाचे नाव | रॉयल्टी प्रती कि.मी. |
|---|---|---|
| १. | मे. कोनार्क इन्फ्रास्ट्रक्चर लि., उल्हासनगर | ०.९०<br>(अक्षरी नव्वद पैसे मात्र) |
| **२.** | **मे. केस्ट्रेल इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि., उल्हासनगर** | **१.००**<br>**(अक्षरी एक रुपये मात्र)** |
| ३. | मे. इगल कन्स्ट्रक्शन कंपनी, उल्हासनगर | ०.६५<br>(अक्षरी पासष्ट पैसे मात्र) |

निविदा धारकांपैकी मे. केस्ट्रेल इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि., उल्हासनगर यांचा देकार हा सर्वात जास्त म्हणजे रु. १.०० प्रती कि.मी. इतका आला. मे. केस्ट्रेल इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि., यांचे दर, रॉयल्टी प्रती कि.मी. वाढवून घेण्यासाठी दि. ०३/०७/२०१० च्या पत्रांन्वये पुनश्च वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले, परंतु मे. केस्ट्रेल इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि., यांनी प्रती कि.मी. १ रुपये एवढी रॉयल्टीपेक्षा जास्त देकार देता येणार नाही असे लेखी कळविले.

परिवहन उपक्रमाद्वारे पी.पी.पी. (सार्वजनिक खाजगी सहभाग) बसेस मार्गस्थ प्रस्ताव तपासणी, वाटाघाटी व अंतिमीकरण करुन देणे यासाठी केंद्र शासनाच्या C.I.R.T. (Central Institute of Road Transport), पुणे यांच्याकडे संपूर्ण कागदपत्रासह पाठविण्यात आला. या संस्थेचा संपूर्ण प्रस्तावावर अभिप्राय दि. १२/०७/२०१० रोजी महानगरपालिका उपक्रमास प्राप्त झाला. C.I.R.T. यांनी दिलेल्या अभिप्रायानुसार सर्वात जास्त देकार देणाऱ्या ठेकेदाराची निविदा स्विकारण्यास हरकत नाही असे नमूद केलेले आहे.

C.I.R.T. यांचे अभिप्रायानुसार मे. केस्ट्रेल इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि., उल्हासनगर यांचा सर्वात जास्त रॉयल्टी प्रती कि.मी. एक रुपया हा सद्य. स्थितीत मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील चालू असलेल्या ५० बसेस, JNNURM योजने अंतर्गत ५० बसेस व भविष्यातील M.B.M.T. च्या माध्यमातून चालविण्यात येणाऱ्या बसेससाठी मान्य करण्यास ही स्थायी समिती ठरावात खालील नमूद बाबीचा अंतर्भाव करून मंजूरी देत आहे.

१) निविदा संचा मध्ये नमूद केलेल्या सर्व अटी व शर्ती यांचे पालन करणे बंधनकारक राहील.
२) M.B.M.T. च्या बसेस मध्ये महिलासाठी ६ सीट, जेष्ठ नागरीक २ सीट व शाररीक दृष्टया अपंग व्यक्तीसाठी ३ सीट राखीव ठेवणे बंधनकारक राहील.
३) करारनामा झाल्यानंतर त्याची प्रत स्थायी समिती समोर सादर करावी.
४) शहर वाहतूक तिकीट दरामध्ये वाढ करावयाची असल्यास परिवहन समिती / स्थायी समिती / महासभा यांची परवानगीसह इतर शासकीय नियमानुसार परवानगी घेणे आवश्यक राहील.
५) LED, GPS, Smart Card, system / Ticket Vending Machine (TVM) व इतर सर्व आधुनिक गोष्टीचा समावेश करणे ठेकेदारावर बंधनकारक राहील.
६) M.B.M.T. ची सेवा शहरातील व शहराबाहेरील सर्व मार्गावर चालेल यांची जबाबदारी ठेकेदाराची राहील.
७) प्रत्येक रुट वरील बसेस साठीच्या फेऱ्या ठरविण्यात येतील. प्रति बस दैनदिन १८० कि.मी. किंवा प्रत्यक्षात प्रती दिन कि.मी. यापैकी जे जास्त असेल ते ठेकेदाराकडून Royalty घेताना विचारात घेतले जाईल.
८) Bank Guarantee विहीत नमुन्यात व मुदतीत M.B.M.T. कडे सादर करणे बंधनकारक राहील.

९) वाहक / चालक विमा / प्रवासी विमा काढणे /थर्ड पार्टी विमा सुरक्षा व प्रत्येक वर्षी नुतनीकरण करणे याची जबाबदारी ठेकेदाराची राहील.

१०) जिवीत हानी, वित्त हानी, कामगाराचे वेतन कायदे व कामगारांच्या संबधीत सर्व कायदे, अधिनियम यांचे पालन करण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहील.

११) बस निवारे यांची बांधणी महानगरपालिका हद्दीत स्टीलचे तयार करुन त्यावर निविदा कालावधी पर्यंत जाहिरातीचे हक्क देण्यात येत आहेत व निविदा कालावधीत बांधणी केलेले स्टिलचे बस निवारे यांची स्वच्छता व दुरुस्ती वेळोवेळी करणे हे ठेकेदारावर बंधनकारक राहील.

**बर्नड डिमेलो :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मदन उदितनारायण सिंह :-**

मा. आयुक्त साहेब, मिनिमम किलो. मिटर किती राहिल? ते आपण ठरवल का?

**मा. आयुक्त :-**

आहे ना.

**मदन उदितनारायण सिंह :-**

पर बसेस.

**मा. आयुक्त :-**

मिनिमम २२५ आहे.

**मदन उदितनारायण सिंह :-**

मिनिमम २२५

**अनिल सावंत :-**

त्याच्यामध्ये असा क्लॉज करा. प्रतिदिन दैनंदिन २२५ कि.मी किंवा प्रत्यक्षात प्रतिदिन कि.मी. यापैकी जे जास्त असेल तो ठेकेदारांकडून रॉयल्टी घेताना विचारात घेतली जाईल.

**मा. आयुक्त :-**

तेच घातल आहे.

**अनिल सावंत :-**

त्याच्यामध्ये नरोवा कुंजरू आहे.

**मा. आयुक्त :-**

नाही. तेच आहे. त्याची बस बंद पडली तरी ते कि.मी. ॲड होणार.

**अनिल सावंत :-**

मिनिमम २२५

**शरद पाटील :-**

साहेब, ५० बसमध्ये आपले ५० टक्के पैसे आहेत ना.

**मा. आयुक्त :-**

मा. सभापती साहेब, महापालिकेचे ठेका पध्दतीने चालू असलेले बस आहेत. त्याच जे व्हॅल्युशन करून त्या ठेकेदाराने घ्यायचे आहे. ते संपूर्ण खर्च त्यांनी करायचा आहे. नविन जे जे.एन.एन.यु.आर.एम. खाली सेन्ट्रल गर्व्हरमेन्टचे आलेले आहेत. त्यामध्ये स्टेट ने आणि सेन्ट्रल ने जे अनुदान दिलेले आहे. ४.९८ ते तेवढच आपण खर्च करायच आहे. ४.९८ महापालिकेने घालायच आहे ते ठेकेदाराने घालायच आहे. आणि १५० बसेस त्यांनी स्वतःच्या खर्चाने आणायच आहे.

**मदन उदितनारायण सिंह :-**

यात महापालिकेचा सहभाग काहीच नाही.

**शरद पाटील :-**

म्हणजे या बसमध्ये आपले पैसे नाही.

**मा. आयुक्त :-**

आपले महापालिकेचे नाही. पण गर्व्हरमेन्टचे ४९८ आहेत.

**शरद पाटील :-**

आपला एक पैसाही लागणार नाही.

**मा. आयुक्त :-**

२०० बसेसमध्ये आपला १ पैसाही लागणार नाही. ५० बसेस मध्ये आपल गर्व्हरमेन्टचे ग्रॅण्ड ४ कोटी ९८ लाख रू. लागणार. महापालिकेचा घालायच होत ते बंद केल.

**शरद पाटील :-**

ते जे आपल्याला पैसे देणार ते किती बसमागे पैसे देतील?

**मा. आयुक्त :-**

टोटल २५०.

**मा. सभापती :-**

विषय सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**शरद पाटील :-**

त्याना अनुदान आपल्याला द्यायला लागत नाही.

**मा. आयुक्त :-**

म्हणजे आता जर विचार केला तर १० वर्षामध्ये दर वर्षी ३ कोटी १०X ३ = ३० कोटी आपले वाचले. परत त्यांच्याकडून आपल्याला दरवर्षी २ कोटी रू. मिळतील आणि वाढीव असेल.

**शरद पाटील :-**

म्हणजे आपल्याला जे सेन्ट्रल गर्व्हरमेन्ट आणि हे लोन देणार याच्यातून आपण पेड करणार.

**मा. आयुक्त :-**

अस काही नाही. ती सबसिडी आहे.

**मा. सभापती :-**

तहकुब विषय घेण्यात यावा.

**अनिल सावंत :-**

मा. आयुक्त साहेब, याच्यामध्ये बस थांबे, आणि बसवरील ॲडव्हटाईजमेंट त्याचा कुठे उल्लेख नाही.

**मदन उदितनारायण सिंह :-**

बस थांबे पण त्यांनी केले पाहिजे.

**मा. आयुक्त :-**

संपूर्ण त्याने मेन्टनंन्स त्याच सगळं टोटल आहे. आपला काहीच संबंध नाही.

**शरद पाटील :-**

आपण त्यांना बसेस उभे करायला जागा देणार तर त्याचं आपल्याला भाडं काही मिळणार का?

**मा. आयुक्त :-**

त्यांच त्यांनी व्यवस्था करायची.

**जुबेर इनामदार :-**

बस स्टॉप त्यांनी उभे करायचे. त्याला डिझाईन कोण देणार?

**मा. आयुक्त :-**

त्यांनी आपल्याकडे सादर करणार. आपण मंजूरी देणार.

**जुबेर इनामदार :-**

साहेब, गेल्यावेळी जे बस स्टॉप तयार करण्यात आले होते ते बरोबर नव्हते. उभ राहताही येत नव्हत.

**अनिल सावंत :-**

ते सगळे शहरातले काढून टाका.

**जुबेर इनामदार :-**

डिझाईन आपण देवूया ना.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

बस स्टॉपवर तो जाहिरात करेल. त्याच हे कोणाला मिळेल?

**मा. आयुक्त :-**

त्यांनाच मिळेल.

**जुबेर इनामदार :-**

मुंबईच्या धर्तीवर एम.एम.आर.डी.ए. ने जसे बस स्टॉप यार केले आहेत. त्याचप्रकारे बस स्टॉप तयार केले अहेत त्याच प्रकारचे बस स्टॉप स्टेनलेस स्टील चे बस स्टॉप....

**मा. आयुक्त :-**

आज तो ४०, ४५ कोटी रू. इन्वेस्टमेन्ट करणार आहे. आणि महापालिकेला दरवर्षी २ कोटी रू. देणार आहे.

**जुबेर इनामदार :-**

साहेब मुंबईच्या धर्तीवर एम.एम.आर.डी.ए. ने जसे बस स्टॉप स्टेनलेस स्टिलचे तयार केलेले आहेत. तसेच चांगले बस स्टॉप तयार करून त्याच्यावर त्याने जाहिरात करावी. असा त्या ठरावामध्ये आपण उल्लेख करूया.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजुर

**प्रकरण क्र. ४३ :-**

'मिरा भाईंदर परिवहन उपक्रमाच्या' बसेस सार्वजनिक व खाजगी सहभागातून चालविणे करिता प्राप्त निविदांपैकी कमी दराच्या निविदेस मंजूरी देणेबाबत.

**ठराव क्र. ३८ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाची स्थापना मा. महासभा दि. २०/०१/२००५ रोजी ठराव क्र. ६२ अन्वये करणेत आलेली होती. तद्नंतर मा. महासभा दि. १८/०२/२००५ ठराव क्र. ७२ अन्वये परिवहन समितीची स्थापना करण्यात आली.

परिवहन समिती सभा दि. ०४/०६/२००५ ठराव क्र. ०५ अन्वये परिवहन उपक्रम खाजगी तत्वावर चालविण्याची मंजुरी देण्यात आली. परिवहन उपक्रमाने निविदा प्रक्रिया करुन प्रती कि.मी. दर मागविले, त्यामध्ये एकूण तीन निविदा धारकांनी प्रत्यक्ष भाग घेतला. सर्वात कमी दर मे. महालक्ष्मी कृपा इन्फ्रा. प्रा. लि. यांचे प्रती कि.मी. दर रु. १९/- प्रमाणे निश्चित करण्यात आले व दि. १५/०९/२००५ पासून मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाची बस सेवा सुरु झाली.

सन २००५ ते आजपर्यंत परिवहन उपक्रम चालविण्यासाठी महानगरपालिकेकडून मिळालेले अनुदान खालीलप्रमाणे आहे.

**आकडे लाखात**

| **२००५-०६** | **२००६-०७** | **२००७-०८** | **२००८-०९** | **२००९-१०** | **२०१०-११ (माहे जून पर्यंत)** | **एकूण** |
|---|---|---|---|---|---|---|
| ५५.५४ | १२०.०० | १७०.०० | १०५.०० | २२५.०० | ६०.०० | **७३५.५४** |

मागील पाच वर्षामध्ये मिळालेले अनुदान पाहता ७.३५ कोटी एवढे अनुदान मिरा भाईंदर महानरपालिकेकडून परिवहन सेवा चालविण्यासाठी परिवहन उपक्रमाला दिलेले आहे. वरील बाबींचा विचार करता परिवहन उपक्रमास होणारा तोटा हा वाढत चाललेला आहे असे दिसून येते.

सन २००९ या वर्षात केंद्र शासनाची JNNURM योजने अंतर्गत शहर परिवहनसाठी बसेस उपलब्ध करुन घेणेसाठी मा. स्थायी समिती सभा दि. ०४/०५/२००९, ठराव क्र. ०१ अन्वये मे. अर्बन मास ट्रांन्झिट कंपनी यांचे कडून २५० बसेस करीता डी.पी.आर. (Detail Project Report) बनवून केंद्र शासनाकडे पाठविण्यात आला. सदर डी.पी.आर. ला अनुसरुन केंद्रशासनाकडून मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमासाठी पहिल्या टप्प्यात ५० बसेससाठी ११ कोटी रुपये मंजूर केलेले आहेत.

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या सद्य स्थितीमध्ये मे. महालक्ष्मी कृपा इंन्फ्रा. प्रा. लि. यांचे मार्फत भाडे तत्वावर चालू असणाऱ्या सर्व बसेस शासकीय नियमानूसार घसारा मूल्य वजा करून संबधित ठेकेदाराने हस्तातरण करून घ्यावयाच्या आहेत हयाची सर्व रक्कम (१००%) ठेकेदाराने अदा करावयाची आहे.

केंद्र शासनाच्या JNNURM योजने अंतर्गत ५० टक्के रक्कम महानगरपालिका, ३५ टक्के रक्कम केंद्र शासन व १५ टक्के रक्कम राज्य शासन या प्रमाणात निधी उपलब्ध होणार आहे. ५० बसेस खरेदी करण्यासाठी प्रकल्प अहवालानुसार (LED, Multiplex Wiring, GPS वगळून) किंमत रु. ९,८८,७८,८००/- (अक्षरी नऊ कोटी अठ्याऐंशी लाख अठ्याहत्तर हजार आठशे मात्र) एवढा खर्च येणार आहे. JNNURM च्या नियमावलीनुसार ५० टक्के रक्कम म्हणजेच रु. ४,९४,३९,४००/- (अक्षरी चार कोटी चौऱ्यान्नव लाख एकोणचाळीस हजार चारशे मात्र) एवढी रक्कम महानगरपालिकेला स्वतः गुंतवणूक करणे आवश्यक आहे व उर्वरीत रक्कम रु. ४,९४,३९,४००/- शासनाकडून अनुदान स्वरुपात प्राप्त होणार आहे.

M.B.M.T. ने केंद्र शासनाला सादर केलेल्या D.P.R. नुसार उर्वरित १५० बसेस मंजूर झाल्यानंतर या साठी केंद्र शासनाकडून अनुदान (५०%) उपलब्ध करून दिले नाही तर संपूर्ण १००% खर्च हा ठेकेदारास करावा लागणार आहे, जर केंद्र शासनाने अनुदान उपलब्ध करून दिले तर त्या प्रमाणात रॉयल्टी सुद्दा ठेकेदाराने वाढवून देणे क्रमप्राप्त आहे.

| **अ. क्र.** | **तपशिल** | **शासनाकडून उपलब्ध होणारे अनुदान** | **ठेकेदाराकडून P.P.P. माध्यमातून उपलब्ध होणारी रक्कम** |
|---|---|---|---|
| १ | सद्य. स्थितीत M.B.M.T. च्या चालू असणाऱ्या बसेस हस्तातरण करणे. | - | १००% |
| २ | JNNURM अंतर्गत ५० बसेस | ५०% | ५०% |
| ३ | भविष्यात D.P.R. नूसार उर्वरित १५० बसेस खरेदी बाबत. | ५०% | ५०% |
